सोलापूर तरुण भारत
आसमंत

**आषाढी एकादशी ही विठ्ठलभक्तांसाठी पर्वणी. विठ्ठल 'लोकदेव' आहे. तो सर्वांना स्वीकारणारा आणि सर्वांनी स्वीकारलेला असा आहे. विठ्ठल घराघरांमध्ये पोहोचलेला आहे. कारण संतांनी आईच्या रूपात त्याचे स्वरूप आपल्यासमोर मांडले आहे. देव, वडील वा गुरूंना समजून घेण्यास विद्वत्तेची, योग्यतेची गरज असते. मात्र आईजवळ जाण्यासाठी अपार प्रे एवढीच गोष्ट पुरेशी असते. आज त्याचीच प्रचीती येते.**

प्रासंगिक | चारुदत्त आफळे

# जाईन गे माये तया पंढरपुरा...

भाविकांसाठी आषाढी एकादशीचा दिवस पर्वणीपेक्षा कमी नाही. वारीची मोठी परंपरा असणाऱ्या महाराष्ट्रामध्ये या दिवसाचे मोठे महत्त्व आहे. आपल्याकडे वारीची परंपरा हजार वर्षांपासून दिसते. कारण आपले वडीलदेखील वारीला जात होते आणि त्यांनीच आपल्याला वारीच्या सोहळ्यात समाविष्ट करून विठ्ठल भक्तीच्या परंपरेमध्ये सामावून घेतले, असा उल्लेख ज्ञानेश्वर महाराज आणि निवृत्तिनाथांच्या अभंगांमध्ये आढळतो. महाराष्ट्राचा प्राप्त इतिहास ज्ञानेश्वरांपासूनच लक्षात घेतला जात असल्याचे मानले तर लक्षात येते की, वारीची परंपरा खूप जुनी आहे.

नामदेवांच्या घरातही वारी आहे आणि तुकोबांच्या घरी तर आहेच आहे. तेव्हा सगळ्या संतांच्या जीवनात वारीचा उत्सव दिसतो. अर्थात तेव्हाची वारी कशी होती, किती मोठी होती याबाबत फारशी माहिती मिळत नाही. पण अनेक लोक आषाढी- कार्तिकीला पंढरीला जात होते हे नक्की. वारीचे आत्ताचे रूप तुकोबांचे चिरंजीव नारायण महाराजांपासून दिसू लागले, असे म्हटले जाते. त्याचे काही ठळक उल्लेख इतिहासात मिळतात. नारायण महाराजांनी तुकोबा आणि ज्ञानेश्वरांच्या पादुका एकत्र घेऊन वारीचा दंडक सुरू ठेवला. वारी एकाच मार्गाने जात असल्यामुळे बरेच लोक सोहळ्याच्या सेवेपासून वंचित राहत होते. ही अडचण लक्षात घेऊन पुढे दोन मार्ग करण्यात आले. ज्ञानदेव आणि तुकोबांच्या पालख्या वेगवेगळ्या मार्गाने पंढरपूरला पोहोचू लागल्या. अधिकाधिक लोकांना सहभागी करून घेणे, हाच यामागचा हेतू होता. आजही महाराष्ट्रातील ४० ते ५० क्षेत्रांमधील दिंड्या एकत्र येतात आणि परंपरेचे पालन करत सोहळा पार पडतो.

विठ्ठल हा 'लोकदेव' आहे. तो सर्वांना स्वीकारणारा आणि सर्वांनी स्वीकारलेला असा आहे. विठ्ठल घराघरांमध्ये पोहोचलेला आहे. याचे कारण संतांनी आईच्या रूपात त्याचे स्वरूप आपल्यासमोर मांडले आहे. देव, वडील वा गुरूंना समजून घेण्यास विद्वत्तेची, योग्यतेची गरज असते. मात्र, आईजवळ जाण्यासाठी अपार प्रेम एवढीच गोष्ट पुरेशी असते. या नात्याने विठ्ठलाशी बांधले गेल्यामुळे तो अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचला. गाणपत्य म्हणजे फक्त गणपतीची उपासना करणारे चिंतामणी देवदेखील वारीला येऊ लागले आणि शाक्त म्हणजे फक्त देवीची उपासना करणारेही वारीला आले. अशा प्रकारे दत्तभक्त, महानुभावही यात आले. संतांनी वारीमध्ये आल्यास स्वागतच आहे, हा विचार या सगळ्या पंथापर्यंत पोहोचवला आणि त्यांनीही विठ्ठलाच्या वारीला जात असल्याचा अभिमान बाळगला. अशा तऱ्हेने विठ्ठलाची माउली अर्थात 'विठाई माउली' झाली. पूर्वपीठिका अशीच सांगितली जाते की, पुंडलिक नावाचा ऋषी पंढरपुरामध्ये तपश्चर्या करीत होता. त्याला भेटण्यासाठी गोपालकृष्ण तिथे आले. पण आम्ही तुझी तपश्चर्या करायची आणि मग तू इथे येऊन दर्शन द्यायचे, असे न करता तू कायमस्वरूपी इथे राहा, म्हणजे आम्हाला तुला केव्हाही भेटता येईल, असा आग्रह पुंडलिकाने धरला आणि देवाने त्याचा स्वीकारही केला. या कथेनुसारही पुंडलिकाने देवाला मित्र, सखा केल्याचे दिसते. भाविकांना तो अगदी जवळचा वाटण्यामागे हेदेखील एक कारण म्हणता येईल. अन्य देवतांच्या रूपाबद्दल अशा स्वरूपाची भावना जाणवत नाही. त्यांच्याकडे अजूनही गुरूंच्या रूपातच पाहिले जाते. त्याबद्दल एक प्रकारचा धाक जाणवतो. मात्र इथे सगळेजण विठ्ठलाशी येऊन भांडतात, उराउरी भेटतात, त्याला लेकुरवाळा करतात. आईपाशी असतो तोच मोकळेपणा त्यांना त्याच्याठायी जाणवतो.

वारीचे रूपही असेच देखणे आहे. ज्ञानेश्वर महाराज सांगतात की, खरे तर मुलाला नटण्यात काहीही रस नसतो. पण तरीही आई त्याला नटवते. कारण, तिला आपली मुले तशी बघण्यातच सुख असते. आमची विठाई माउली तशीच आहे. ती आम्हाला भक्तिप्रेमाने नटवते आणि भेटण्यासाठी, पाहण्यासाठी जवळ बोलावते. वारीच्या सोहळ्याला ज्ञानदेवांनी दिलेले हे रूप किती देखणे आहे पाहा! थोडक्यात, आईचे गोड रूप घेतल्यामुळे हा लोकदेव जनसामान्यांपर्यंत पोहोचलेला दिसतो. वारीत शिस्त आहे, परंपरेचे पालन आहे तसेच अत्यंत साधेपणाही आहे. या निमित्ताने समाज एकत्र येतो. एकमेकांमध्ये मिसळून जातो. खरे तर हा एक संस्कार सोहळा आहे, असेच म्हणता येईल. भाविक सर्व असुविधांचा स्वीकार करून आपल्या भक्तीचे, प्रेमाचे प्रकटीकरण करतात. भगवंताच्या उपासनेत रममाण होतात. तसे बघायला गेले तर वारीतील उपासना खूप कडक असते. नियम काटेकोरपणे पाळले जातात. ठरावीक वेळी आरती, कीर्तने होतात. उपासनेची ही कठोरता पाळताना प्रत्येक वारकरी सुविधेकडे लक्ष न देता ईश्वरावरील भक्तीला प्रथम स्थान देतो. वारीच्या निमित्ताने याचा संस्कार आणि सराव होतो. वारीबद्दल ज्ञानेश्वरांचा एक वेगळा विचारही लक्षात घेण्याजोगा आहे. 'अवघाचि संसार सुखाचा करीन, आनंदे भरीन तिन्ही लोक' असे ते म्हणतात. इथे आईने म्हणजेच विठ्ठलाने मला सासरी सुखाचा संसार करायला पाठवले आहे, असे ते सांगतात आणि तो किती सुखाचा केला हे सांगण्यास दरवर्षी मी तिच्याकडे जातो, असे स्पष्ट करतात. जाईन गे माये तया पंढरपुरा, भेटेन माहेरा आपुलिया... म्हणजेच वर्षभरात कोणते चांगले काम केले, किती जणांना सन्मार्गी लावले, किती जणांना संस्कारी केले, सजग केले हे सांगण्यास मी पंढरीला जातो. विठ्ठलाला याबाबत सांगणे ही माझी जबाबदारी आहे, असे ते स्पष्ट करतात. ज्ञानदेवांनी वारीला इतके गोड रूप दिले आहे. ईश्वरभक्तांची मांदियाळी करून दाखवण्याचे विठ्ठलाने दिलेले काम त्यांनी स्वीकारले. एक प्रकारे त्याचा लेखाजोखा मांडण्यासाठी ते दरवर्षी पंढरीत जातात. वारीचा अशा कितीतरी सुंदर पद्धतीने आणि वेगवेगळ्या आयामांनी विचार केला आहे,

(पान ४ वर)







# अमेरिका आणि इराणमधील युद्ध वर्चस्वाचे!



**अमेरिका- इराणमधील युद्धविरामानंतर जगाने सुटकेचा निःश्वास सोडला असतानाच, पुन्हा दोन्ही देशांमध्ये संघर्षाची ठिणगी पडली. या ठिणगीचे पुन्हा भीषण युद्धात रुपांतर झाल्यास, पश्चिम आशियासह जगभरात त्याचे तीव्र पडसाद उमटतीलच. त्यानिमित्ताने या वर्चस्वाच्या युद्धामागची कारणमीमांसा करणारा हा लेख...**

लक्ष्यवेध | अनय जोगळेकर



अमेरिका आणि इराणमधील युद्धाला आखातात पुन्हा एकदा सुरुवात झाली. इराणने आपल्या हद्दीतून होर्मुझची सामुद्रधुनी न ओलांडणाऱ्या जहाजांवर हल्ला केल्याने अमेरिकेने इराणमधील महत्त्वाच्या लष्करी ठिकाणांवर हल्ले करायला सुरुवात केली. अमेरिकेला उत्तर देताना इराणने प्रथक कुवेत आणि बहारीनमध्ये; तर त्यानंतर संयुक्त अरब अमिराती, कतार आणि जॉर्डनवरही हल्ले केले. एका दिवसात इराणने सुमारे ५० क्षेपणास्त्रे आणि ड्रोनचा हल्ल्यांसाठी वापर केला. या हल्ल्यांमुळे तेलाच्या किमती सुमारे दहा डॉलरनी वाढल्या. इराणने होर्मुझच्या आखातावर नियंत्रण प्रस्थापित केल्याचा दावा केला आहे. १३ जुलै रोजी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रुथ या आपल्या समाजमाध्यमावर म्हटले की, अमेरिकेने इराणच्या जहाजांवर होर्मुझच्या सामुद्रधुनीबाहेर पडण्यास बंदी घातली असून, इतर देशांसाठी ती खुली आहे. त्यांनी अमेरिकेला गार्डियन ऑफ द होर्मुझ स्ट्रेट ही पदवी बहाल केली आणि होर्मुझबाहेर पडणाऱ्या जहाजांवर त्यांच्यातील मालाच्या किमतीवर २० टक्के कर लावला. ओमानच्या किनाऱ्याजवळ इराणने पाणसुरुंग पेरले नसल्यामुळे तेथून जहाजांची वाहतूक करणे शक्य असले, तरी या जहाजांवर इराण क्षेपणास्त्रांनी हल्ले करत आहे. त्यामुळे अमेरिका दररोज किती जहाजांना सुरक्षित प्रवास करून देऊ शकेल आणि त्याबदल्यात त्यांच्यावर कशाप्रकारे कर लावू शकेल, हा प्रश्न आहे.

कतार आणि पाकिस्तानच्या मदतीने युद्धविरामासाठी करण्यात आलेला करार जेमतेम सहा आठवडे टिकला. कराराच्या मसुद्यातच त्याच्या अपयशाची कहाणी लिहिली होती. हा करार झाल्यावर अमेरिकेने घोषित केले की, आता होर्मुझची सामुद्रधुनी सर्व प्रकारच्या जहाजांच्या वाहतुकीसाठी खुली करण्यात आली आहे. अमेरिकेचे नेतृत्व अशा भ्रमात होते की, इराणच्या सर्वोच्च नेत्यांची फळी मारली गेल्यानंतर, इतर नेते अमेरिकेला भिऊन समझोत्यास तयार होतील, वाटाघाटींच्या काळात अमेरिका सामुद्रधुनीवरील इराणची पकड सैल करून पर्यायी जलमार्ग खुले करू शकेल, वाटाघाटी अयशस्वी झाल्यास या मार्गांचा वापर करून इराणला पुन्हा एकदा एकटे पाडणे शक्य होईल, या भ्रमात अमेरिका होता.

प्रत्यक्षात परिस्थिती याउलट होती. इराणमधील नवे सत्ताधारी अत्यंत जहाल विचारसरणीचे आहेत. त्यांनी जाणीवपूर्वक अमेरिकेच्या २५० व्या स्वातंत्र्यदिनी म्हणजेच, दि. ४ जुलै रोजी इराणचे मारले गेलेले सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी आणि त्यांच्या कुटुंबीयांचा दफनविधी ठेवला. सुमारे आठवडाभर चाललेल्या या कार्यक्रमास १०० हून अधिक देशांनी आपले प्रतिनिधी पाठवले होते. त्यात इराणशी शत्रुत्व असलेल्या आखाती अरब देशांचाही समावेश होता. इराणच्या नेतृत्वाच्या दृष्टीने अमेरिका वाटाघाटींस तयार झाली. याचाच अर्थ, अमेरिका हे युद्ध लढू शकत नाही. इराणचे म्हणणे आहे की, होर्मुझची सामुद्रधुनी दोन महिने वाहतुकीसाठी खुली करण्यात आली असली, तरी सर्व जहाजांनी इराणने आखून दिलेल्या मार्गानेच म्हणजेच, इराणच्या सागरी हद्दीतून मार्गक्रमण करावे. भविष्यामध्ये या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या प्रत्येक जहाजावर कर लावून त्याचे उत्पन्न इराण आणि ओमान यांनी वाटून घ्यावे, अशी इराणची योजना आहे. तेलाच्या प्रत्येक बॅरलवर सुमारे दोन डॉलर इतका कर लावून युद्धात आपले झालेले नुकसान भरून काढण्याची इराणची योजना आहे. आंतरराष्ट्रीय जलमार्गांवर कर-आकारणी करता येत नसली, तरी इराणकडून त्याला आंतरराष्ट्रीय कायद्याच्या चौकटीत बसवण्याचा प्रयत्न केला जात आहे. असे झाल्यास, इराण पुढचे अनेक महिने अमेरिकेशी वाटाघाटी सुरू ठेवून स्वतःची आर्थिक आणि लष्करी ताकद वाढवू शकेल.

अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या हवाई हल्ल्यांमध्ये इराणच्या अणुप्रकल्पांचे प्रचंड नुकसान झाले असले, तरी इराणकडे ४४० किलोहून अधिक समृद्ध केलेले युरेनियम आहे. त्यातून दहा अण्वस्त्रे तयार करता येऊ शकतील. इराण उत्तर कोरियाकडून अण्वस्त्राची तस्करी करून त्याचे परीक्षण करण्याचीही शक्यता आहे. इराणने अण्वस्त्र चाचणी केल्यास भविष्यात इराणवर लष्करी कारवाई करणे अशक्य होईल. ट्रम्प यांच्यावरील टीकाकारांचे मत आहे की, इराणचा बागुलबुवा उभा करून युद्ध चालू ठेवण्याचे अमेरिकेचे युद्धतंत्र आहे. अमेरिका रणांगणावर इराणचा पराभव करू शकत नाही, तसेच होर्मुझच्या सामुद्रधुनीवरची त्याची पकडही सैल करू शकत नाही. तरीही, शहाणपणा न शिकता अमेरिका आपल्या युद्धखोर वृत्तीने संपूर्ण जगाला वेठीस धरत आहे. हे युद्ध मर्यादित स्वरूपात राहिले, तर त्याचा अमेरिका आणि इराण या दोन्ही देशांना फायदा होऊ शकतो. अमेरिका आणि इराण यांच्यामध्ये ज्या परिस्थितीत युद्धविराम झाला ते पाहता, अमेरिकेत नोव्हेंबर महिन्यात होणाऱ्या मध्यावधी निवडणुकांचा त्यावरील प्रभाव स्पष्ट आहे. या निवडणुकांमध्ये ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाला संसदेच्या एका सभागृहामध्ये बहुमत गमावण्याची भीती आहे. तेलाचे भाव चढे राहिल्यास रिपब्लिकन पक्षाचा दोन्ही सभागृहांमध्ये पराभव होऊ शकेल. असे झाल्यास डेमोक्रॅटिक पक्ष

(पान ६ वर)



# आशियातील शक्तिसंतुलनाची नवी मांडणी!

**भारत- जपान संबंधांनी अलीकडे आर्थिक सहकार्याच्या चौकटीपलीकडे जाऊन व्यापक सामरिक स्वरूप धारण केले आहे. हिंद- प्रशांत क्षेत्रातील बदलत्या भू- राजकीय वास्तवाच्या पार्श्वभूमीवर संरक्षण, आर्थिक सुरक्षा, सेमीकंडटर, महत्त्वाची खनिजे, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पुरवठा साखळी यांसारख्या क्षेत्रांतील वाढते सहकार्य दोन्ही देशांच्या परराष्ट्र धोरणातील नव्या प्राधान्यक्रमांचे द्योतक ठरले. ही भागीदारी आशियातील शक्तिसंतुलन, आंतरराष्ट्रीय व्यवस्था आणि चीनच्या वाढत्या प्रभावाच्या संदर्भातही महत्त्वपूर्ण मानली जात आहे. भारत- जपान भागीदारीचा चीनवर होणार्या परिणामांचा आढावा घेणारा लेख...**

राष्ट्ररक्षा **हेमंत महाजन**

नवी दिल्लीमध्ये अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि जपानच्या पंतप्रधान सनाए ताकाइची यांच्यात पार पडलेली द्विपक्षीय शिखर परिषद हिंद- प्रशांत क्षेत्राच्यादृष्टीने एक अत्यंत महत्त्वाचा टप्पा ठरली. या परिषदेत दोन्ही देशांनी संरक्षण, आधुनिक तंत्रज्ञान, सेमीकंडटर पुरवठा साखळी आणि आर्थिक सुरक्षांसारख्या अत्यंत संवेदनशील विषयांवर महत्त्वपूर्ण करार केले. यानंतर अवघ्या काही तासांतच आलेली चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाची प्रतिक्रिया अत्यंत बोलकी आहे. चीनने प्रतिक्रिया देताना म्हटले की, कोणत्याही दोन देशांमधील सहकार्य, हे तिसऱ्या देशाच्या विरोधात नसावे. जर आपण या प्रतिक्रियेमागचा वास्तविक अर्थ शोधल्यास, या करारांमुळे चीनच्या सर्वांत दुखऱ्या नसांवर बोट ठेवले गेल्याचे स्पष्ट होते. भारत आणि जपानमधील ही वाढती जवळीक आशियातील चिनी वर्चस्वाला थेट दिलेले आव्हान ठरत आहे.

**आर्थिक सुरक्षेचे नवे रणांगण:-** गेल्या काही दशकांत भारत आणि जपानचे संबंध प्रामुख्याने आर्थिक मदत, पायाभूत सुविधांचा विकास आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीपुरतेच मर्यादित होते. मात्र, अलीकडच्या शिखर परिषदेत या संबंधांनी एक नवी उंची गाठली आहे. आजच्या २१ व्या शतकात युद्धात शस्त्रास्त्रांबरोबरच तंत्रज्ञान आणि अर्थव्यवस्था महत्त्वाची आहे. म्हणूनच, भारत आणि जपानने एका अत्यंत महत्त्वाच्या आराखड्याची घोषणा केली. या आराखड्यानुसार दोन्ही देश पुढील क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करणार आहेत.

**सेमीकंडटर पुरवठा साखळी मजबूत करणे:-** आज मोबाईल फोनपासून ते प्रगत लढाऊ विमानांपर्यंत, प्रत्येक गोष्टीसाठी सेमीकंडटरचे महत्त्व सर्वाधिक आहे. सध्या सेमीकंडटरच्या व्यापारावर तैवान आणि चीनचेच मोठे नियंत्रण आहे.

**कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ५जी/ ६जी तंत्रज्ञान:-** भविष्यातील सायबर सुरक्षा आणि दळणवळण यंत्रणेच्या सुरक्षेसाठी भारत आणि जपान संयुक्त संशोधन करणार आहेत. चीनने गेल्या काही वर्षांत अवाढव्य उत्पादन क्षमतेच्या जोरावर संपूर्ण जगालाच स्वतःवर अवलंबून राहण्यास भाग पाडले. चीनला विरोध करणाऱ्या देशांना, चीन याच शक्तीच्या आधारे नमवण्याचा प्रयत्न करतो. भारत आणि जपानचा नवा आर्थिक सुरक्षा आराखडा चीनच्या या धोरणाविरुद्ध एक मोठी ढाल मानला जात आहे.

**क्रिटिकल मिनरल्स:-** या क्षेत्रात चीनची मोठीच मक्तेदारी आहे. त्यामुळेच महत्त्वाच्या खनिज उत्पादनात दोन्ही देशांचे परस्पर सहकार्य चीनच्या दुखऱ्या नसेवरचा आघात ठरणार आहे.

आज जगभरात इलेक्ट्रिक वाहने, सोलर पॅनेल्स, अत्याधुनिक बॅटरी, स्मार्टफोन आणि आधुनिक लष्करी उपकरणांची मागणी प्रचंड वेगाने वाढली आहे. ही सर्व उपकरणे तयार करण्यासाठी लिथियम, कोबाल्ट, निकेल आणि इतर दुर्मीळ खनिजांची आवश्यकता असते. त्यामुळे भारत आणि जपानमधील या क्षेत्रातील करार देशाला दीर्घकाळ सुरक्षा देणारे ठरणार आहेत.

**चिनी वर्चस्वाची भीती:-** सध्या जगातील दुर्मीळ खनिजांच्या ७० ते ९० टक्के शुद्धीकरण आणि पुरवठ्यावर एकट्या चीनचे नियंत्रण आहे. २०१० मध्ये जपानशी झालेल्या सागरी संघर्षानंतर चीनने जपानला होणारी दुर्मीळ खनिजांची निर्यात रोखली. त्याचा जपानच्या इलेट्रॉनिस उद्योगाला मोठाच फटकाही बसला. याच पार्श्वभूमीवर भारत आणि जपानने दुर्मीळ खनिज शोध, त्यांचे शुद्धीकरण आणि त्यांच्या सुरक्षित पुरवठा साखळीसाठी एकत्र काम करण्याचा निर्णय घेतला आहे. भारत स्वतः देशात खाणकाम आणि प्रक्रिया उद्योगाला चालना देण्याच्या प्रयत्नात आहे. तर, जपानकडे यासाठीचे प्रगत तंत्रज्ञान आणि आर्थिक गुंतवणुकीची क्षमता आहे. हे दोन्ही देश एकत्र आल्यास चीनवरील जागतिक अवलंबित्व हळूहळू कमी होईल.

**संरक्षण क्षेत्रात क्रांतिकारी बदल :-** या शिखर परिषदेत दोन्ही देशांनी युनिकॉर्न या अत्याधुनिक प्रणालीच्या संयुक्त विकासाची अधिकृत घोषणा केली.

**काय आहे युनिकॉर्न प्रणाली?**

हा एक अत्यंत प्रगत नौदल अ‍ॅण्टेना असून, युद्धाच्या वेळी युद्धनौकांचा शत्रूच्या रडारपासून बचाव करण्यास तो उपयुक्त आहे. म्हणजेच, यामुळे युद्धनौकांची स्टील्थ क्षमता प्रचंड प्रमाणात वाढते. हा अ‍ॅण्टेना जपानच्या सहकार्याने भारतीय युद्धनौकांवर बसवला जाणार आहे. या प्रकल्पातून जपानच्या परराष्ट्र आणि लष्करी धोरणातील एका मोठ्या ऐतिहासिक बदलाचे संकेत मिळतात.

दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात जपानने स्वतःवर अत्यंत कडक लष्करी बंधने लादली होती. शांततावादी संविधान स्वीकारून जपानने शस्त्र निर्यात पूर्णपणे बंद केली होती. पुढे पंतप्रधान शिंझो आबे यांच्या काळात या धोरणामध्ये बदल करण्यात आला. पंतप्रधान शिंझो आबे यांनी चीनचा वाढता धोका ओळखून ही बंधने हळूहळू शिथिल करण्यास सुरुवात केली. पुढे आता पंतप्रधान सनाए ताकाइची यांच्या काळात जपानने आता सर्व सीमा ओलांडत, इतर देशांना थेट घातक लष्करी शस्त्रे विकण्यास आणि त्यांचा संयुक्त विकास करण्याचे धोरण स्वीकारले आहे.

जपानचे बदलते धोरण हा चीनसाठी अत्यंत चिंतेचा विषय आहे. एका बाजूला जपानचे तंत्रज्ञान अत्यंत प्रगत आणि जागतिक दर्जाचे आहे; तर दुसऱ्या बाजूला भारताची बाजारपेठ मोठी असून, औद्योगिक क्षमताही अफाट आहे. हे दोन्ही देश एकत्र येऊन जेव्हा लष्करी उपकरणांचे उत्पादन सुरू करतील, तेव्हा त्याचा थेट परिणाम चीनवर होणार आहे. युनिकॉर्न हा केवळ प्रारंभीचा टप्पा असून, भविष्यात भारत आणि जपान ड्रोन तंत्रज्ञान, लढाऊ विमाने आणि पाणबुड्यांची निर्मिती संयुक्तपणे करतील, हीच चीनची खरी भीती आहे.

**भाऊ- बहीण कथा आणि चीनची चिडचिड:-** मोदी-ताकाइची भेटीनंतर चीनमध्ये विविध प्रतिक्रियांचा पूर आला आहे. अलीकडच्या शिखर परिषदेत दोन्ही देशांत झालेले करार चीनच्या प्रभावाला रोखण्यासाठीचे पाऊल आहे, असा चीनला संशय आहे.

**सनाए ताकाइची: चीनची सर्वांत नावडती नेता :-** गेल्या वर्षांत चीन आणि जपानमधील संबंध कमालीचे ताणले गेले आहेत. ताकाइची यांच्या आगमनाने जपानच्या धोरणांमध्ये आणखीच आक्रमकता आली आहे. त्यांनी अनेकदा उघडपणे काही भूमिका घेतल्या, त्या पुढीलप्रमाणे:-

**तैवानला स्पष्ट पाठिंबा:-** तैवानवर चीनने लष्करी कारवाई केल्यास जपान शांत बसणार नाही, असे संकेत ताकाइची यांनी दिले.

**लष्कराचे सक्षमीकरण:-** जपानचे संरक्षण बजेट ऐतिहासिक पातळीवर वाढवून ताकाइची यांनी जपानला पुन्हा एक मोठी लष्करीशक्ती करण्याचा विडाच उचलला आहे.

**चीनविरोधी आघाड्यांचे जाळे:-** आजवर जपानच्या काही पंतप्रधानांनी चीनबरोबरच आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी मवाळ भूमिका घेतली होती. मात्र, ताकाइची यांनी आर्थिक हितसंबंधांपेक्षा देशाच्या सुरक्षेला सर्वाधिक महत्त्व दिले आहे. त्यासाठी ताकाइची यांनी नवी सुरक्षा आघाडीही उघडली आहे. तसेच फिलीपिन्स, इंडोनेशिया आणि व्हिएतनाम या दक्षिण चीन समुद्रातील देशांनाही लष्करी मदत देण्यास सुरुवात केली. चीनचा प्रभाव रोखण्यासाठी ताकाइची जे तटबंदीचे जाळे विणत आहेत, त्या जाळ्यातील सर्वांत मजबूत भागीदार भारत आहे.

**क्वाडचे घट्ट होत जाणारे पाश :-** भारत -जपान परिषदेनंतर प्रसिद्ध करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात क्वाडच्या उद्दिष्टांना जोरदार पाठिंबा देण्यात आला. या गटाची सातत्याने वाढती शक्ती दिवसेंदिवस चीनची झोप उडवत आहे. अलीकडच्या शिखर परिषदेत दोन्ही देशांनी कायद्यावर आधारित जागतिक व्यवस्थेवर भर दिला. तसेच कोणत्याही देशाने बलपूर्वक सध्याची सीमा बदलण्याचा प्रयत्न करू नये, असेही ठणकावून सांगितले. हे विधान चीनच्या आक्रमक विस्तारवादी धोरणांवर मारलेला आसूड होता.

**दक्षिण आणि पूर्व चीन समुद्रातील वादात भारताची उडी :-** भारत- जपान शिखर परिषदेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, भारताने अतिशय स्पष्ट शब्दांत पूर्व चीन समुद्र आणि दक्षिण चीन समुद्रातील घडामोडींवर जपानच्या भूमिकेला पाठिंबा दिला आहे. जर चीन भारताच्या लडाख किंवा अरुणाचल प्रदेशच्या सीमेवर कुरघोड्या करणार असेल; तर भारतदेखील चीनच्या अंगणात म्हणजेच, दक्षिण चीन समुद्रात चीनला घेरण्यास मागेपुढे पाहणार नाही, असा संदेश यातून चीनला गेला आहे.

**अमेरिकेच्या अनिश्चिततेमुळे जपानचे हेजिंग धोरण :-** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यकाळात अमेरिकेचे परराष्ट्र धोरणाचे तत्त्व अमेरिका फर्स्ट हे आहे. ट्रम्प यांनी भूतकाळात अनेकदा मित्रदेशांना स्वतःच्या संरक्षणाची जबाबदारी घेण्यास सांगितले आहे किंवा त्यासाठी पैशांचीही मागणी केली आहे. यामुळे भविष्यात चीनबरोबर संघर्ष निर्माण झाल्यास अमेरिका खरोखरच जपानच्या मदतीला येईल का? अशी शंका जपानला वाटत आहे. यामुळेच जपानने आता हेजिंगचे धोरण स्वीकारले आहे. या धोरणानुसार, जपान आता केवळ अमेरिकेच्या भरवशावर न राहता, आशियात स्वतःचे नवे विश्वासू मित्र तयार करत आहे. यात भारत हा जपानसाठी विश्वासार्ह भागीदार ठरतो. कारण, भारताकडे चीनचा सामना करू शकणारे, जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वांत मोठे लष्कर आहे. तसेच भारत स्वतः चीनच्या विस्तारवादी धोरणांचा थेट बळी ठरला आहे. आशियातील देश आता केवळ अमेरिकेच्या मागे न जाता, एकत्र येऊन चीनचे वर्चस्व मोडण्यासाठी एकत्र येत असल्याची चाहूल चीनला लागली आहे. शेवटी, हे समजून घ्यावे लागेल की, चीनच्या चिंतेचे कारण वास्तवाशी जोडलेले आहे. चीनला दिसत आहे की, जपानने बंधनाचे सर्व पाश तोडून नव्याने आक्रमक लष्करीशक्ती होण्याकडे वाटचाल करण्याचे धोरण स्वीकारले आहे. दुसरीकडे भारतही त्याची आर्थिक आणि धोरणात्मक शक्ती सातत्याने वाढवत आहे. तर, महत्त्वाची खनिजे आणि सेमीकंडटर क्षेत्रातील भारत आणि जपानी सहकार्यामुळे भविष्यात चीनच्या आर्थिक मक्तेदारीला धोका निर्माण झाला आहे.

थोडक्यात सांगायचे, तर भारत- जपान शिखर परिषदेने अशा एका बहुध्रुवीय आशियाई व्यवस्थेचा पाया घातला आहे. या व्यवस्थेत भविष्यात चीनची दादागिरी चालणार नाही. चीनला या गोष्टीची भीती आहे की, या भागीदारीमुळे हळूहळू त्याचा आशियातील प्रभाव कमी होऊन जागतिक पटलावर त्याला एका प्रबळ प्रतिस्पर्धी आघाडीचा सामना करावा लागेल.

# बालहक्क; दयेचा नव्हे, तर हक्काचा प्रश्न



**एखाद्या मुलाला प्रेम, शिक्षण, सुरक्षितता आणि सन्मानाने जगण्याची संधी मिळावी, ही एक नैतिक अपेक्षा आहे. परंतु आधुनिक जगात या अपेक्षेकडे केवळ दयाभाव किंवा कल्याणकारी दृष्टिकोनातून पाहिले जात नाही; तर ती मुलाची मूलभूत हक्क म्हणून मान्यता प्राप्त गरज मानली जाते. म्हणूनच आज बालहक्क ही संकल्पना केवळ सामाजिक कार्याचा किंवा कल्याणकारी योजनांचा विषय राहिलेली नाही, तर ती मानवी हक्कांच्या चौकटीतील एक स्वतंत्र आणि महत्त्वाची संकल्पना बनली आहे.**

पोरकी पोरं **डॉ. तुषार सावरकर**

काही दशकांपूर्वीपर्यंत मुलांकडे प्रामुख्याने पालकांच्या मालकीच्या किंवा संरक्षणाची गरज असलेली व्यक्ती म्हणून पाहिले जात होते. मुलांना स्वतंत्र व्यक्तिमत्त्व, मत आणि हक्क असलेले नागरिक म्हणून फारसे स्थान नव्हते. औद्योगिक क्रांतीनंतर बालमजुरी, युद्धांमधील मुलांचे मृत्यू, दारिद्र्य आणि शोषण या प्रश्नांनी जगाचे लक्ष वेधून घेतले. पहिल्या महायुद्धानंतर लाखो मुलांच्या हालअपेष्टांनी बालहक्कांसाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रयत्न सुरू झाले. यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली ती ब्रिटिश सामाजिक कार्यकर्त्यांनी. १९१९ मध्ये त्यांनी या संस्थेची स्थापना केली आणि १९२३ मध्ये मुलांच्या हक्कांबाबत एक मसुदा तयार केला. पुढे १९२४ मध्ये जिनेव्हा डिक्लेरेशन ऑफ द राईट्स ऑफ द चाईल्ड स्वीकारली. ही बालहक्कांच्या इतिहासातील पहिली महत्त्वाची आंतरराष्ट्रीय घोषणा मानली जाते.

दुसऱ्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्याने मानवी हक्कांना केंद्रस्थानी ठेवून अनेक महत्त्वाचे उपक्रम सुरू केले. १९४८ मध्ये स्वीकारलेल्यांमध्ये प्रत्येक व्यक्तीच्या सन्मान आणि समानतेवर भर देण्यात आला. त्यानंतर १९५९ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने बालहक्कांचे घोषणापत्र स्वीकारले. या घोषणेमध्ये मुलांच्या संरक्षण, शिक्षण आणि विकासावर भर देण्यात आला; परंतु ती कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक नव्हती. बालहक्कांच्या इतिहासातील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे २० नोव्हेंबर १९८९ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेने स्वीकारलेला बाल हक्क जाहीरनामा. हा करार जगातील सर्वाधिक देशांनी मान्य केलेल्या आंतरराष्ट्रीय करारांपैकी एक आहे. भारताने १९९२ मध्ये या कराराला मान्यता दिली. सीआरसी नुसार मुलगा किंवा मुलगी म्हणजे १८ वर्षांखालील कोणतीही व्यक्ती. या करारामध्ये बालहक्कांचे चार प्रमुख स्तंभ मांडण्यात आले आहेत.

पहिला म्हणजे जगण्याचा हक्क. यामध्ये अन्न, आरोग्यसेवा, पोषण, निवारा आणि जीवनासाठी आवश्यक सुविधा यांचा समावेश होतो. दुसरा, विकासाचा हक्क (शिक्षण, खेळ, सांस्कृतिक सहभाग, माहिती मिळविण्याचा अधिकार आणि सर्वांगीण विकासासाठी आवश्यक संधी या या हक्काचा भाग आहेत.) तिसरा, संरक्षणाचा हक्क अत्याचार, दुर्लक्ष, शोषण, बालमजुरी, बालविवाह, लैंगिक हिंसा आणि तस्करीपासून संरक्षण मिळणे हा प्रत्येक मुलाचा अधिकार आहे. चौथा आणि तुलनेने कमी चर्चिला जाणारा हक्क म्हणजे सहभागाचा हक्क. मुलांना त्यांच्या जीवनाशी संबंधित बाबींमध्ये मत व्यक्त करण्याचा आणि त्यांचे मत गांभीर्याने ऐकले जाण्याचा अधिकार आहे. ही संकल्पना आधुनिक बालहक्क चळवळीचे वैशिष्ट्य मानली जाते.

बालहक्कांच्या अंमलबजावणीमध्ये भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. १९४६ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेने जगभरात लसीकरण, पोषण, शिक्षण, बालसंरक्षण आणि आपत्कालीन मदत या क्षेत्रांमध्ये मोठे योगदान दिले आहे. तसेच बालमजुरीविरोधी करार आणि धोरणांद्वारे महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारतीय राज्यघटनेतही बालहक्कांचे संरक्षण करण्यासाठ विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत. कलम २१- अ अंतर्गत ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांसाठी शिक्षण हा मूलभूत अधिकार मानण्यात आला आहे. कलम २४ अंतर्गत १४ वर्षांखालील मुलांना धोकादायक उद्योगांमध्ये काम करण्यास मनाई करण्यात आली आहे. राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमधील कलम ३९ (ई) आणि (एफ) मध्ये मुलांच्या आरोग्य आणि विकासाच्या संरक्षणावर भर देण्यात आला आहे. या घटनात्मक तत्त्वांच्या आधारे भारतात अनेक महत्त्वाचे कायदे अस्तित्वात आहेत. २००९ चा शिक्षणाचा हक्क कायदा, २०१२ चा पोक्सो कायदा, २०१५ चा किशोर न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) कायदा तसेच बालम जुरी प्रतिबंधक कायद्यातील सुधारणा हे त्यापैकी प्रमुख कायदे आहेत.

भारतात बालहक्कांच्या संरक्षणासाठी ही वैधानिक संस्था २००७ मध्ये स्थापन करण्यात आली. राज्य पातळीवरही बालहक्क आयोग कार्यरत आहेत. बालहक्कांचे उल्लंघन, शाळाबाह्य मुले, बालमजुरी, बालविवाह आणि संस्थात्मक संगोपन यांसारख्या प्रश्नांवर या संस्था काम करतात. बालहक्कांच्या क्षेत्रात अनेक व्यक्तींनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. भारतात बालमजुरीविरोधी चळवळ उभी केली आणि हजारो मुलांना मुक्त करण्यासाठी काम केले. त्यांच्या या कार्याची दखल २०१४ मध्ये घेण्यात आली. शिक्षण आणि मुलींच्या हक्कांसाठी कार्य करणाऱ्यांनीही जगभरातील बालहक्क चळवळीला नवी दिशा दिली. तथापि, कायदे आणि आंतरराष्ट्रीय करार असूनही वास्तव अनेकदा वेगळं चित्र दाखवतं. बालमजुरी, बालविवाह, लैंगिक अत्याचार, तस्करी, कुपोषण, शाळाबाह्य मुलं आणि डिजिटल माध्यमांमधील नव्या प्रकारच्या धोक्यांमुळे लाखो मुलांचे हक्क अजूनही धोक्यात आहेत. त्यामुळे बालहक्क ही केवळ कायदेशीर किंवा प्रशासकीय संकल्पना नसून सामाजिक आणि नैतिक जबाबदारीही आहे. महत्त्वाची बाब म्हणजे बालहक्क म्हणजे मुलांना अमर्याद स्वातंत्र्य देणे किंवा पालकांच्या अधिकारांना आव्हान देणे नव्हे. बालहक्क म्हणजे मुलांना त्यांच्या वय, गरजा आणि सन्मानाला अनुरूप संधी आणि संरक्षण उपलब्ध करून देणे. हे पालक, समाज आणि राज्य यांच्या परस्परपूरक जबाबदाऱ्यावर आधारित तत्त्वज्ञान आहे. आजच्या काळात बालहक्कांकडे दयेच्या दृष्टीने नव्हे, तर न्यायाच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. कारण प्रत्येक मूल हे केवळ भविष्यातील नागरिक नाही; वर्तमानातील स्वतंत्र (पान ६ वर)

कथा **रश्मी वाघमारे**



# गौरी झाली दुर्गा

सकाळचे सात वाजले होते. दुर्गाने नेहमीसारखी आपली सायकल काढली. तिला बरेच काम होते. चार घरचा स्वयंपाक, त्यानंतर एका आजींकडे जाऊन त्यांची देखभाल करायची आणि थकून भागून संध्याकाळी घरी परतायचे. त्या छोट्या वस्तीत दुर्गाचं छोटसं दीडखणी घर, दोन लेकी आणि कधीतरी काम करणारा, बेजबाबदार नवरा, असं कुटुंब होतं. दुर्गा सुमारे ३५ वर्षांची, उंच काळी सावळी, मात्र नीटनेटकी राहणारी! दुर्गाची मतं स्पष्ट, तिचे जीवनाविषयीचे तत्त्वज्ञान रोखठोक.


नवरा तसा नावाचा राजा, मात्र आळशी. मनात आलं तर काम करणार नाहीतर खुशाल घरी पिऊन झोपून राहणार. तिला आठवलं ते गेल्या वर्षी परभणीहून या मोठ्या शहराकडे आलेले. जेमतेम काही गुंठे जमीन.... दुष्काळानं कर्जबाजारी केलं आणि त्यात राजाला दुःख विसरायला दारूची सवय लागलेली. कर्जाचा हा डोंगर, थोडीशी मी तीही गहाण पडली. सासू सासरे म्हणाले, दुर्गे, तू आता शहरात जा, दोन्ही पोरी घेऊन, त्याशिवाय आता गती नाही. आम्ही कशीबी करू स्वतःची देखभाल, तुमचं हाल आता बघवना आम्हासनी. आणि दुर्गाने शहराचा रस्ता धरला. दुर्गा मॅट्रिक झालेली, त्यामुळे शिक्षणाचे चांगल्या संस्काराचे महत्त्व जाणणारी अशी होती. राजाला चौकीदारीचे काम तिच्याच ओळखीने मिळाले. तिची कामसू वृत्ती, आयुष्यात पुढे जाण्याची ओढ, तिने स्वतःच मुलींना सरकारी शाळेत घातले. सकाळ संध्याकाळ तिचं अखंड काम करणं आणि पैसे कमावणं, हे सगळं राजाच्या पथ्यावरच पडत होतं. त्यामुळे तो निष्काळजीपणे कधी कधी आठ-दहा दिवस घरी पडून राहत असे. दुर्गाने कशीबशी रखडत चालणारी संसाराची गाडी वाटेवर आणली.

आज सकाळचाच प्रसंग. राजाने बाहेर निघताना सकाळी सात वाजता तिची वाट अडवली आणि दारूकरिता पैसे मागू लागला. दुर्गाने त्याचे मनगट धरले आणि त्याला निक्षून सांगितले आज कामावर जा, नाहीतर माझ्याशी गाठ आहे आणि तिने जोरात त्याचा हात पिरगळला. तिच्या डोळ्यातील क्रोध बघून राजा मुकाट्याने बाजूला झाला आणि दुर्गाने आपली सायकल काढली. ती तिच्या कामावर जायला निघाली. चला आली आपली मधुगंधा सोसायटी; तिने मनाशीच हुश्श म्हटले आणि लिफ्टमध्ये चढून नवव्या मजल्याचे बटन दाबले. गौरी मॅडमच्या फ्लॅटमध्ये शिरताच तिच्या कामाचा झपाटा सुरू झाला. चहा- कॉफी- नाश्ता व टिफीनसाठी भाजी-पोळी-सॅलड! एका मागोमाग एक, तिचे हात यांत्रिकपणे चालू लागले. सर्व कामं आटोपून ती गॅलरीमध्ये चहाचा कप घेऊन कशीबशी टेकली. आता सातव्या मजल्यावर पळावे असा विचार करतानाच छोटा आरव शाळेसाठी तयार होऊन आला. मावशी माझे दूध? हो हो देते. एक मिनिट... असं म्हणत दुर्गा त्वरेने उठली आणि किचनकडे वळली. तिने त्याच्या विशिष्ट कपातून आरवला दूध दिले. गौरी मॅडम आपल्या तयारीनिशी दिसल्या; मात्र त्यांच्या डोळ्याखाली काळे निळे व्रण दिसताच दया चमकली.

गौरी एका कंपनीमध्ये नोकरी करीत होती. पदवीधर, एका मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेली. प्रकाश तिच्यापेक्षा उच्च स्तरामधून आलेला. असलेली चांगली नोकरी सोडून त्याने शेअर्सच्या व्यवसायात उडी घेतली. त्यात होते नव्हते त्या साऱ्याची होळी झाली आणि तो वैफल्यग्रस्त झाला, निराश झाला. विचार करत बसून राहू लागला. त्याची मनस्थिती आणि परिस्थिती दोन्ही बिकट झाल्या. तो गौरीवर राग काढू लागला. बिचार्या गौरीला सहन करण्याशिवाय कोणताही पर्याय नव्हता. तो मानसिकदृष्ट्या खचला आहे हे तिला कळत होते, पण... ती शक्य होईल तेवढा आधार देत होती.

गौरी मॅडमचे सुजलेले डोळे, सुकलेला चेहरा आणि उदासीनता एक कहाणी सांगत होती. चला मॅडम ब्रेकफास्ट देते- असं म्हणत दुर्गाने गौरी मॅडमला कॉफी- सँडविच आणि त्यांचा लंच बॉक्स पुढे केला. घ्या तुम्ही निवांत. मी आवरते बाकीचं... गौरी मॅडमने कसेबसे सँडविच संपवले आणि त्या कामावर जायला निघाल्या.

दुसऱ्या दिवशीची सकाळ! रोजच्या सारखी दुर्गा तयार झाली. राजा आज नव्या ताकतीने तिला आडवा आला आणि पैसे मागू लागला. दुर्गाच्या डोळ्यात अंगार फुलला. तिने राजाच्या थोबाडीत एक लगावली. ती ठाम आवाजात म्हणाली... मी पोलिसात तक्रार करीन. खबरदार दारू प्यायला पैसे मागितले तर. गपगुमान कामावर जा! राजा वरमला. आणि कामावर जायला निघाला. राजा बाजूला झाला आणि दुर्गा निघाली आपल्या कामावर. ती गौरी मॅडमकडे पोहोचली. आज ती गाणे गुणगुणत होती. खुशीत होती. बेडरूममधून जोरजोरात भांडणाचे आवाज येत होते. रेडिओ लागलेला होता; त्या आवाजात प्रकाश तार स्वरात ओरडत गौरीला दोष देत होता. त्याने बहुतेक तिच्यावर हात उचलला. कारण मध्येच गौरीचा कळवळून रडण्याचा आवाज आला. तो किंचाळून म्हणत होता, तुझ्यामुळेच मी हरलो, तुझा पायगुण वाईट आहे. तू आहेसंच पनवती... तेवढ्यात गौरी मॅडम बाहेर आल्या. तोंडावर पाणी मारून त्या तोंड पुसत होत्या. त्या डायनिंग टेबलवर बसल्या आणि नकळत दुर्गाने त्यांच्या खांद्यावर हात ठेवला. गौरी मॅडमच्या डोळ्यातून घळघळा अश्रू वाहू लागले. त्यांनी दुर्गाचा हा धरून आपल्या दुःखाला वाट मोकळी करून दिली. तुम्ही दुर्गेचा अवतार व्हा.... आता अजून सहन करू नका. आजचा प्रसंग शेवटचा ठरू दे. दुर्गा म्हणाली. अचानक रेडिओवर एक भारदस्त आवाज ऐकू आला....



**मत् खुद की खोज में निकल ।**
**तू किसलिए हताश है।**
**तू चल तेरे वजूद की,**
**समय को भी तलाश है।**
**जला के भस्म कर उसे जो क्रूरता**
**का जाल है। तू आरती**
**की लौ नहीं तू क्रोध**
**की मशाल है ।**


वळणावरच्या नोंदी

स्वाती काळे

भारत देशात जेव्हा जेव्हा धर्मसत्ता खिळखिळी झाली तेव्हा परकीय आक्रमणे होऊन आपली अमाप संपत्ती देशाबाहेर गेली, हा इतिहास आहे. १० व्या शतकापासून इ. स. १००१ ते १०२४ पर्यंत गझनीचा महमूद भारतावर वारंवार आक्रमणे करीत होता. सशक्त मध्यवर्ती राज्य भारतात अस्तित्वात राहिले नव्हतेच. बौद्ध धर्म लयाला जात होता. महमूद वेगाने चढाई करून लूट घेऊन तेवढ्याच वेगाने परत जायचा.

भारतावर राज्य करण्यापेक्षा येथल्या संपत्तीचा मोह त्याला अधिक होता. याच अनिश्चित वातावरणात

# अल्बेरुनीच्या नजरेतून...



महमूदच्या दरबारात असणारा एक अतिशय बुद्धिमान तत्त्वज्ञ भारतात फिरत होता. हिंदू धर्माचा, तत्त्वज्ञानाचा, वेदपुराणांचा आणि योगव्याकरणांचा अतिशय बारकाईने अभ्यास करीत होता. त्याचे नाव होते अल्बेरूनी उर्फ अबू अल्-रैहान मुहंमद इब्न अहमद.

अल्बेरुनीची बुद्धी अतिशय तीक्ष्ण आणि लहान वयापासूनच त्याला सर्व विषयांमध्ये गती होती. गणित, खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र, भूगोल, इतिहास, भविष्यशास्त्र, खनिजे या सर्व विषयांवर त्याची पकड होतीच; विशेष म्हणजे अरेबियन, पर्शियन, तुर्की, संस्कृत, ग्रीक, अर्मेनियन, हिब्रू अशा अनेक भाषांचे त्याला ज्ञान होते. इ. स. ९७३ मध्ये खिवा नावाच्या गावी खोरासान प्रांतात त्याचा जन्म झाला. खोरासान म्हणजे प्राचीन ख्वारिझम अर्थात सध्याचा उत्तरपूर्व इराण, दक्षिण तुर्कमेनिस्तान आणि उत्तर अफगाणिस्तान यांच्या मधोमधचा भाग होता. सध्या प्राचीन खोरासानचा मुख्य भाग इराणमध्ये आहे. दुर्दैवाची गोष्ट अशी की, गझनीचा महमूद खोरासानमध्ये युद्ध जिंकून परत जात असताना त्याने येथील सर्व विद्वान माणसे युद्धकैदी म्हणून धरून नेली. अल्बेरुनी हा युद्धकैद्यांपैकीच एक कैदी होता. अगोदर खिवाच्या दरबारात सन्मानाने काम करणारा अल्बेरुनी आता खजिल मनाने महमुदाच्या दरबारी आला, पण त्याची धारदार बुद्धिमत्ता अजूनही शाबूत होती. इ. स. १०१७ नंतर महमूदबरोबर अल्बेरुनी भारतात आला. १३ वर्षे उत्तर भारतात तो गावोगावी फिरला. इ. स. १०३० मध्ये त्याचे पुस्तक लिहून पूर्ण झाले.

तहकीक-ए-हिंद या त्याच्या ग्रंथात भारतीय समाजाविषयी त्याने अतिशय सखोल निरीक्षणे नोंदविली आहेत आणि म्हणूनच इतिहासकारांसाठी हा ग्रंथ म्हणजे एक अनमोल ठेव आहे. या ग्रंथाचे वैशिष्ट्य म्हणजे स्वतः मुसलमान असूनही त्याने हिंदूंच्या मूळ ग्रंथातले उतारे दिलेले आहेत. हिंदू धर्मातल्या त्रुटी काढण्याचा हेतू या ग्रंथात दिसत नाही. एका तटस्थ तत्त्वचिंतकाने चिंतन-मनन करून हिंदू धर्माबद्दल लिहिले आहे असे वाटते. हिंदू आणि ग्रीक संकल्पना यांचाही साकल्याने विचार करून त्याने तुलनात्मक ऊहापोह केला आहे. अल्बेरुनीला भारतीय समाजाचे निरीक्षण करताना येथील सणवार बघायला मिळाले. तो म्हणतो, येथील बहुतांशी सणवार बायका-मुलेच साजरा करताना दिसतात. याचा अर्थ, दीड हजार वर्षांपूर्वी भारतीय स्त्रियांनीच संस्कृतीचे रोपटे आपल्या हातांनी लावले. तो पुढे म्हणतो, चैत्राच्या द्वितीयेला काश्मीरच्या लोकांचा मोठा सण असतो.

येथील राजा मुत्तईने तुर्कांना पराभूत केले त्या प्रीत्यर्थ हा सण साजरा होतो. चैत्र महिन्याच्या एकादशीला हिंडोली चैत्र सण सगळीकडे साजरा होतो. या दिवशी कृष्णाला पाळण्यात घालून सुखाचे झोके देतात. चैत्र पौर्णिमेला वसंतोत्सव साजरा करतात. हा उत्सव खास बायकांचा असतो. स्त्रिया नटून-थटून आपल्या पतिराजांना लाडिकपणे भेटी मागतात. चैत्राच्या द्वादशीला चैत्र-कटी म्हणतात. भगवती देवीच्या या उत्सवात लोक स्नान करून दानधर्म करतात. वैशाखाच्या तृतीयेला गौरी तृतीया म्हणतात. बायका महादेवाच्या गौरीची पूजा करतात. तिच्यासमोर दीपमाळ लावतात, नटतात, उंच उंच झोके घेतात, उपास करतात आणि दुसऱ्या दिवशी दानधर्म करून उपास सोडतात. वैशाख दशमीला निमंत्रित पंडित उघड्या माळरानावर जातात आणि चार गटांमध्ये १६ जागांवर पौर्णिमेपर्यंत यज्ञयाग करतात. पौरोहित्य करणारे चार गट म्हणजे चार वेद समजले जातात. याच महिन्यात वसंतोत्सव असतो. घरात भरभराट असावी म्हणून ज्येष्ठ प्रथमेला दारी उगवलेल्या सर्व फळांना पाण्यात सोडले जाते. ज्येष्ठ पौर्णिमेला बायकांचा रूप पंख उत्सव असतो. आषाढात घरी नवी भांडी आणली जातात. दानधर्म केला जातो. श्रावणात पंडित पुरोहितांना जेवण दिले जाते. आश्विन महिन्यात महादेवाच्या बहिणीचा भगवती उत्सव असतो.

१५ व्या दिवशी मुक्या जनावरांशी खेळले जाते आणि कुस्तीचे फडही रंगतात. वासुदेव कृष्णाने कंसाशी कुस्ती खेळून विजय मिळविला होता त्यामुळे या दिवशी कुस्तीला महत्त्व आहे. माघ महिन्यात पितृपक्ष येतो आणि पूर्वजांचे स्मरण होते. भाद्रपदात तृतीयेला हरबली उत्सव बायका साजरा करतात. टोपलीत सर्व प्रकारच्या धान्याच्या बिया अगोदरच पेरलेल्या असतात आणि आता हिरवे धन वरती येऊ लागते. रात्रभर जागरण करून हा सण त्या साजरा करतात.

भाद्रपदाच्या षष्ठीला तुरुंगातील कैदींना अन्नदान केले जाते. कार्तिक महिन्याच्या पहिल्या दिवशी सूर्य तूळेत येतो आणि तेव्हा दिबाली सण साजरा करतात. लोक सकाळी स्नान करून नवीन वस्त्र येऊन देवळात दर्शन घेतात. एकमेकांना पानसुपारी आणि भेटवस्तू देतात. दुपारच्या जेवणात पंचपक्वान्न वाढतात. संध्याकाळी दारोदारी दिवे लागतात. या दिवशी सातव्या पृथ्वीवर बंदीवासात असलेला विरोचनाचा मुलगा बळी याला एका दिवसाकरिता लक्ष्मीने मुक्त केले. तो पृथ्वीवर येतो आणि त्यामुळे या दिवसात बलिराज्य येते, असे छांदोग्य उपनिषदात म्हटले आहे. याच महिन्याच्या पौर्णिमेला घरोघरी मेजवान्या असतात. स्त्रियांनी शृंगार केलेला असतो. गौरीची आणि लक्ष्मीची पूजा पूर्वापार केली जाते. माघातदेखील गौरीसमोर कपडेलत्ते, अत्तर आणि चविष्ट नैवेद्य ठेवला जातो.

मुलतानमधले हिंदू सूर्याची उपासना करीत सणसाजरा करतात. त्यावेळच्या समाजाच्या बऱ्याच रंजक गोष्टी अल्बेरुनीमुळे समजतात. पुरुषही स्त्रियांप्रमाणे सौंदर्यप्रसाधने वापरतात आणि दागिन्यांनी स्वतःला मढवितात. नखे वाढवितात. जेवणापूर्वी मद्यपान करतात; पण जेवण सुरू झाल्यावर मद्यपान बंद होते. कोणतेही महत्त्वाचे निर्णय घेण्यापूर्वी घरच्या स्त्रीला विचारले जाते, पण मुलीकडे थोडे दुर्लक्षच केले जाते.

आपल्याकडे प्राचीन काळापासून जेवणाच्या पंगतीचे महत्त्व आहे. अल्बेरुनीनेदेखील शेणाने सारवलेल्या जमिनीवर पंगत बसते, असे सांगितले आहे. तो म्हणतो, भारतीय लोक उष्टे अन्न खात नाहीत. जेवणासाठी वापरलेली मातीची भांडी नष्ट करण्यात येतात. स्त्रिया घराबाहेर जाताना यजमानाची परवानगी घेऊन जातात. येताना मात्र परवानगी घ्यावी लागत नाही. उत्सवांप्रमाणेच भारतीय जीवनात व्रतवैकल्यांनाही महत्त्व होते उपवास स्वेच्छेने केले जायचे. ज्या देवतेची कृपा व्हावी असे वाटत असेल तिचे नामस्मरण करून, चार दिशांना पाणी शिंपडून, दात घासून उपवास सुरू व्हायचा. दुसऱ्या दिवशीच्या सूर्योदयानंतर अन्नप्राशन केले जायचे. उपवासाचे अनेक प्रकार अल्बेरुनीने सांगितले. दुपारी अन्नप्राशनानंतर दुसऱ्या दिवशी संध्याकाळी उपवास सोडायचा. या उपवास पद्धतीत लागोपाठ तीन दिवस फक्त दुपारी अन्नप्राशन करायचे, नंतरचे तीन दिवस फक्त प्रत्येक संध्याकाळी अन्नप्राशन करायचे आणि त्यानंतरचे तीन दिवस अन्नाला अजिबात स्पर्श करायचा नाही.

(पान ६ वर)



# एकटे राहायचेय...

आनंद स्पदंन

डॉ. अविनाश मोहरील

काकुळतीला येऊन ती म्हणाली, मला कृपया एकटे राहायचेय... यावेळी मला कुणीही माझ्या जवळ नकोय. मला कुणीही समजावू नका, कुणी आधारही देऊ नका. माझ्याबद्दल सहानुभूती तर दाखवूच नका. मला या सगळ्या गोष्टींचा कंटाळा आलाय. तेच तेच बोलून बोलून, तेच तेच करून करून मला आता खरोखरीच वीट आलाय. तुमची अती काळजी करणेदेखील मला आता नकोसे झालेय. गंभीर चेहरे करून तुम्ही मला समजाविण्याचा प्रयत्न करताय, माझ्या काळजीपोटीच हे सारे तुम्ही सर्वजण करताय, हे मला कळतंय. पण तरीही आत्ता या क्षणी मला कुणीही जवळ नकोय. अगदी प्रेमाचंदेखील कुणी नकोय. मला माझ्या स्वतःसोबत राहायचे आहे. विचारशून्य व्हायचे आहे. प्लीज, लीव्ह मी अलोन. सर्वांना हात जोडून ती विनवणी करीत होती.

तिच्या जवळच्या लोकांना कळेचना की ही असे का म्हणते आहे. तिच्या अशा विनवण्यांमुळे स्वाभाविकच तीव्र प्रतिक्रिया उमटायला लागल्या. हिचे हे वागणे तर फारच विचित्र आहे. एवढा मोठा आघात हिच्या आयुष्यात झाला. आयुष्य अक्षरशः उद्ध्वस्त झाल्यागत स्थिती झालीय. आम्ही सर्व जवळचे हिला आधार देण्यासाठी आलोय. हिच्या भविष्याचा विचार आम्ही सर्व करतोय आणि हिचा हा काय वेडेपणा सुरू आहे. आम्हाला हिच्याबद्दल काही वाटते म्हणूनच आम्ही आलोय ना येथे इतक्या लांबून. हिला तर आमच्या प्रेमाची आणि काळजीची काही पर्वा नाही असेच दिसतेय. प्रत्येकजण त्या क्षणी तिला आधार देऊन सांभाळण्याचा प्रयत्न करीत होता. परंतु सांभाळापेक्षा आपले तिच्यावर किती प्रेम आहे आणि तिचा सांभाळ करण्याची संपूर्ण जबाबदारी आता माझीच आहे, असे दाखविण्याचा प्रयत्न तो जास्त वाटत होता. तिच्या त्या एकटे राहू द्या विनंतीला कुणी समजून घेण्याच्या मानसिकतेतच नव्हते. आपल्या भारतीय समाजरचनेमध्ये मला एकटे राहू द्या ही संकल्पनाच मुळात मान्य नाही. त्यामुळे तशी कुणी विनंती केल्यास किंवा तसे राहण्याचा प्रयत्न केल्यास त्यावर लगेचच सामाजिक चौकटीच्या विरोधात वागल्याचा आरोप होतो. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून खरे तर ती प्रत्येक मानवाची मूलभूत गरज आहे. परंतु आपली भारतीय सामाजिक रचना आपल्याला तशा प्रकारची सवलत देत नाही. आपण मुळात सर्व बाबी समूहाने करण्यात प्रसिद्ध आहोत. आपले सर्व जीवनमान, सर्व सणवार, सर्व परंपरा लोकसंग्रह करून पार पडतात. मुळात या सर्व परंपरांची रचनाच तशा प्रकारची करण्यात आलेली आहे. काही वर्षांपूर्वी मी माझ्या स्वीडन देशाच्या अभ्यास दौऱ्यामध्ये तेथील लोकांशी बोलताना, माझ्या परिवाराची ओळख करून देताना माझी पत्नी व मुलांसोबत आई- वडील, भाऊ, त्याची पत्नी, त्याची मुले अशी एकत्रित संख्या सांगायचो तेव्हा त्यांना फार आश्चर्य वाटायचे. वडिलांचा, माझा आणि माझ्या भावाचा असे तीन परिवार मी एकत्र करून सांगतोय, याचे त्यांना नवल वाटायचे.


आमच्या काही सहलींचे फोटो त्यांना मी दाखविले; ज्यात आम्ही १०-१२ परिवार मिळून एकत्रितपणे सहलीला कसे काय जाऊ शकतो, हा त्या मंडळींसाठी कुतुहलाचा विषय असायचा. आपल्या समाजरचनेमध्ये मोठ्या संख्येने एकत्रित येऊनच आपण प्रथा व समारंभ साजरे करतो. परंतु या सर्व सवयींमुळे नव्या काळात आपली जरा अडचण व्हायला लागली आहे. नव्या काळात आवश्यक बनलेला, पण अजूनही आपल्या अंगवळणी न पडलेला प्रकार म्हणजे स्पेस देणे. नव्या जगातील जीवनाच्या वाढलेल्या वेगामुळे किंवा आधुनिकीकरणामुळे प्रत्येकाला स्पेस लागायला लागली आहे. समाजरचनेच्या सवयींप्रमाणे अशा प्रकारची स्पेस हवी असते, हेच मुळात अजून आपण स्वीकारलेले नाही. ही स्पेस दोन लोकांनाच नाही तर एकट्या व्यक्तीलाही हवी असते. त्यातूनच ही मला एकटे राहू द्या यासारखी बाब समोर येते. खरे तर माणसाला स्वतःचा शोध घेण्यासाठी एकटेच राहावे लागते, ही बाब आपल्या धार्मिक व पारमार्थिक तत्त्वज्ञानात समाविष्ट करण्यात आलेली आहे.

ऋषिमुनींनी केलेले ध्यान हा त्यातीलच प्रकार होता. ही सारी धार्मिकसंदर्भात वापरली जाणारी उदाहरणे असल्याने व्यवहारिक जीवनात लागू पडत नाहीत. रोजचे जीवन जगत असताना प्रत्येकाला एकटे राहावे वाटते किंवा वाटू शकते, हा विचारच आपल्याला पचनी पडत नाही. खरे तर असे वाटणे अत्यंत स्वाभाविक असते. मानसशास्त्रीय अभ्यास या गोष्टीची महती सांगतो. प्रत्येकाच्या आयुष्यात कधी कधी सर्वच बाबींचा शीण येतो.

(पान ६ वर)

विवेचन

श्रीरंग श्री. हिर्लेकर



# धनुर्वेद म्हणजे संपूर्ण युद्धशास्त्र

(पूर्वार्ध)

धनुर्वेद म्हणजे फक्त धनुष्यबाणासंबंधीचे शास्त्र असे अनेकांना वाटते. वास्तविक धनू हा शब्द संपूर्ण युद्धविद्येचे प्रतीक आहे. अभियांत्रिकीच्या विद्युत, स्थापत्य, संगणक, रासायनिक या सर्व शाखा, तसे धनुर्वेदाचे उपलक्षण म्हणून संपूर्ण युद्धशास्त्राविषयीचे विवेचन आहे. राम आणि धनुष्य हे नाते सर्वश्रुत असतानाही विभूतियोगात मात्र कृष्णाने रामः शस्त्रभृतामहम्- शस्त्रवीरात राम मी असे म्हणण्याचे कारण हेच. यामुळेच द्रोणाचार्य हे श्रेष्ठ धनुर्धारी असूनही त्यांच्या नावे दिला जाणारा पुरस्कार हा क्रीडा क्षेत्रातील सर्वच विषयांच्या शिक्षकांना दिला जातो. धनुर्वेद हा यजुर्वेदाचा उपवेद आहे. वसिष्ठ, विश्वामित्र, जामदग्न्य यांच्या धनुर्वेद संहितांचा उल्लेख आहे. ब्रह्मदेवाने एक लाख अध्यायांच्या धनुर्वेदाचा उपदेश राजा पृथुला केल्याचा उल्लेख असून रुद्र, इंद्र, प्राचेतस, बृहस्पति, शुक्राचार्य यांनी लघुरूपात त्याचे विवेचन केले. अग्निपुराण, महाभारत, रामायण, कामन्दकीय नीतिसारपासून कौटिल्यापर्यंत धनुर्वेदाच्या अनेक परंपरा सांगितल्या जातात. द्रोणाचार्यांच्या नावे धनुप्रदीप नामक ग्रंथ असून त्यात ७००० श्लोक तर परशुरामांच्या नावे ६० हजार श्लोकांच्या धनुश्चंद्रोदय संहितेचा उल्लेख आहे.

मानसोल्हास आणि मल्लपुराण हे ग्रंथही उपलब्ध आहेत. नुकतेच मी मल्लपुराणाची संशोधित प्रत तयार करून तिचे मराठी भाषांतर केले आहे. यात धनुष्यबाणांव्यतिरिक्त चक्र, गदा, परशु, तलवार, भाला इत्यादी विविध शस्त्रविद्यांचे शिक्षण, रक्षात्मक साधने व त्यांच्या रचना, युद्धासाठी चल आणि स्थिर यंत्रे, मल्लयुद्धासारखे निःशस्त्र युद्ध, चक्रव्यूह, क्रौंचव्यूह, पद्मव्यूह अशा विविध सैन्यरचना, युद्धात अश्व, हत्ती, घोड्यांचे उपयोग, राज्यरक्षण, दुर्गरचना, युद्धनीती, गुप्तहेर व्यवस्था, सैन्य संघटन, प्रशिक्षण व संचलन व्यवस्था हे सर्व विषय येतात.

**धनुर्वेदाचे प्रयोजन आणि युद्धनीती :-** दूरस्थ प्राणी अथवा शत्रूपासून स्वतःचे तसेच धर्माचे, प्रजेचे, समाजाचे रक्षण हे आहे. शस्त्रधार्याने पाळावयाची नीती म्हणजे निःशस्त्रावर वार न करणे, शरणागतास अभय देणे, स्त्रिया, मुले, वृद्ध, वैद्य, समाजोपयोगी व्यक्ती यांच्यावर आक्रमण न करणे, सूर्यास्तानंतर युद्ध थांबविणे, कपट न करणे हे सर्व स्पष्ट केले आहे.

**शस्त्रप्रकार :-** अमुक्त म्हणजे तलवार, गदेसारखी हातातील शस्त्रे, मुक्त म्हणजे फेकून मारण्याची, मुक्तामुक्त म्हणजे दोनही प्रकारची तर यंत्रमुक्त म्हणजे यांत्रिक पद्धतीने क्षेपण करावयाची. प्रशिक्षणापूर्वी योद्ध्याचे शारीरिक बल व चापल्य, मानसिक म्हणजे एकाग्रता, धैर्य, भिरुता, वृत्ती, गुण यांची परीक्षा करून त्याला जे सात्म्य त्या शस्त्र पद्धतीचे शिक्षण द्यावे असे म्हटले आहे. उदा. अर्जुनाची एकाग्रता बघून धनुष्यबाण तर भीम-दुर्योधनाला गदा युद्ध. युद्धप्रकारात पदातियुद्ध, अश्वयुद्ध, गजयुद्ध, रथयुद्ध याप्रमाणे चतुरंग पद्धतींचा विचार आहे. शस्त्रात धनुष्य, चक्र, कुन्त, खड्ग, परशु, गदा आणि बाहुयुद्ध सांगितले आहे. या सर्वांचा ज्ञाता तो आचार्य, यापैकी चारांत प्रवीण तो भार्गव, दोनच विद्येत प्रवीण तो योद्धा आणि एकच जाणतो तो युद्धवेत्ता समजावा. माझ्या संग्रहात संपूर्ण धनुर्वेदाविषयी विवेचन असलेली संहिता आहे. आज मात्र आपण फक्त धनुष्यबाणांविषयी जाणून घेऊ.

**धनुष्याचे प्रकार :-** तीन ठिकाणी वाकवलेले ते शार्ङ्ग, इंद्रधनुष्यासारचे ते वैष्णव, त्र्यंबक पद्धतीच्या धनुष्याचे यौगिकचाप, क्रियाचाप, शलाका, व्याघात, श्रमिक, सांग्रामिक, दूरपाती, दृढभेदी, विकर्षी आणि कार्यसाधक असे १० प्रकार त्यांच्याकडून अपेक्षित कार्यानुसार सांगितले आहेत. धनुष्याचे दैविक, मानुषी आणि निकृष्ट असे तीन गुण असून उपयोगानुसार ते लोह, तांबे, रजत, सुवर्ण, प्राण्यांचे शिंग, लाकूड यापासून विविध वजन आणि लांबीचे बनवल्या जात. प्रत्यंचा रेशीम, हरिण, म्हैस किंवा गायीचे स्नायू अथवा बांबूच्या सालापासून कशी आणि किती जाडीची असावी हे वर्णन आहे.

**बाणांचे प्रकार:-** वजन व आकारानुसार स्त्री- पुरुष व नपुसंक हे लिंगभेद तर जवळ-दूरच्या अंतरावर जाण्याच्या क्षमतेनुसार ज्येष्ठ, मध्यम आणि कनिष्ठ असे सांगितले आहेत. वाऱ्याच्या प्रवाहामुळे वेध चुकू नये म्हणून शरपुच्छावर कोणत्या पक्ष्यांची किती पिसे लावावित हेसुद्धा वर्णन आहे. बाणांच्या टोकांचे आकार व मोजमापे अपेक्षित कार्यानुसार योजिले जात. अर्धचंद्र नावाच्या बाणाने शत्रूचे मुंडके अलगत उडवता येई. दूरच्या लक्ष्यावर सोडण्याचे बाण नळीत स्फोटक द्रव्ये भरून क्षेपित केल्या जात.

स्थिर किंवा चल लक्ष्यांचा वेध घेताना लक्ष्य आणि धनुर्धर यापैकी एक किंवा दोघेही चल असता कोणते बाण निवडावेत, हे ठरलेले असे. दिनमानात म्हणजे सूर्योदय ते सूर्यास्त काळात ४०० वेध घेणारा धनुर्धर धन्वी, ३०० घेणारा मध्यम तर फक्त २०० घेऊ शकणारा दुय्यम. कोण किती दूरच्या अंतरावरील लक्ष्यभेद करू शकतो, यावरूनही त्याची प्रत ठरत असे. अर्जुन आणि राम हे सव्यसाची म्हणजे दोनही हातांनी सारख्याच कौशल्याने बाण चालवीत. राम जसा एकवचनी तसाच एकबाणी. कुशल गोलदांजाजवळ जसे लेग स्पिन, ऑफस्पिन, गुगली, टॉपस्पिन, चायनामन, डुसरा, यॉर्कर, बाऊन्सर, स्विंगर, स्लोअर, बिमर पद्धतीचे तंत्र असावे तसे दोघांच्याही भात्यात अनेक प्रकारचे बाण असून परिस्थितीप्रमाणे क्षणात निवड करून लक्ष्याचा अचूक वेध घेण्याचे कौशल्य होते. अल्पावधीत एकामागून एक बाण सोडल्यामुळे शत्रूला क्षणभराचीही उसंत मिळत नसे. आधी कृपाचार्य, नंतर द्रोणाचार्यांजवळ सर्व शिकून झाल्यावर अर्जुनाने इंद्र, वरुण, यम, कुबेर यांच्याकडूनही धनुर्विद्येतील अनेक दिव्य अस्त्रे आणि शेवटी तर प्रत्यक्ष शंकराजवळून पाशुपतास्त्र शिकून घेतले. सुदर्शन चक्र म्हणजे नेमके काय, ते कसे कार्य करत असावे, याविषयी मी १० वर्षांपूर्वी एक लेख लिहिल्याचे काही वाचकांना आठवत असेल. अस्त्रविद्या तर विलक्षण आहे. अस्त्रांची तुलना आधुनिक गायडेड मिसाईल्सशी करता येते. ब्रह्मास्त्र, नारायणास्त्र म्हणजे व्होकल कमांडवर कार्य करणारी विनाशकारी आण्विक अस्त्रे तर नव्हेत?

## माझा पांडुरंग हरी..!

यावी आषाढ पहाळी भाळी थेंब गोंदवावे,
लाल कोवळ्या पिकांचे
ओले अभंग मी गावे!
व्हाव्या सरींच्या पताका
निळ्या केशरी सावळ्या,
धारा रेघोट्या होऊन
जरा नाचाव्या बावळ्या!
पीक झाले वारकरी जणू पाऊली चालते
माथी पाऊस घेऊन
पुढे मागे ते हालते!
मोर खेळता रहावा मनाआत माणसात
अन् ओंजळी हसाव्या
दान देत आनंदात!
एकतारी चिपळ्यांनी राहो गर्जत पंढरी,
शिवारात नांदतो रे
माझा पांडुरंग हरी!

शशी त्रिभुवन

## सावळा विठ्ठल

सावळा विठ्ठल, आहे हो निर्गुण
भक्तांसाठी आला, होऊन सगुण ।।ध्रु।।
सावळे रूप ते, आहे मनोहर
भक्तांना पावला, घाली अलंकार
मंजुळ नादाचे, सोन्याचे पैंजण
भक्तांसाठी आला, होऊन सगुण
कनकाचा कद, विठोबा सजला
शोभली गळ्यात, मौक्तिकांची माला
माणिक मोत्यात, दिसे भक्तगण
भक्तांसाठी आला, होऊन सगुण
भक्तांनी अर्पिले, नाना अलंकार
भक्तांना भावले, भक्तीचे प्रकार
पावतो भक्तांना, सद्गुणाची खाण
भक्तांसाठी आला, होऊन सगुण
सावळा विठ्ठल आहे हो निर्गुण
भक्तांसाठी आला, होऊन सगुण ।।ध्रु।।

ज्योती कुळकर्णी

# पर्यावरणाचा नव्हे, मानवी अस्तित्वाचाच प्रश्न

पर्यावरण **मिलिंद बेंडाळे**

**सध्या देशभरात पावसाचा धुमाकूळ अनुभवायला मिळत असला, तरी भारतातील उन्हाळ्याची वाढती तीव्रता, विक्रमी उष्णतेच्या लाटा, अनियमित मन्सून, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, ढगफुटी, चक्रीवादळांची वाढती वारंवारता आणि दुष्काळाचे चक्र ही हवामान बदलाची ठळक उदाहरणे सऱ्हास पाहायला मिळत आहेत. एकीकडे काही भाग पाण्याखाली जात आहे तर दुसरीकडे अनेक जिल्हे पाण्याच्या एका थेंबासाठी संघर्ष करीत आहेत. ही विसंगतीच हवामान बदलाच्या गांभीर्याची जाणीव करून देते. सर्वात चिंतेची बाब म्हणजे या बदलांचा सर्वाधिक फटका मानवी आरोग्याला बसत आहे.**

जागतिक आरोग्य संघटना आणि विविध संशोधन संस्थांनी वारंवार इशारा दिला आहे की, हवामान बदल हे या शतकातील सार्वजनिक आरोग्यासमोरील सर्वात मोठ्या धोक्यांपैकी एक आहे. वाढत्या तापमानामुळे उष्माघात, हृदयविकार, मूत्रपिंडाचे विकार, निर्जलीकरण आणि श्वसनाचे आजार झपाट्याने वाढत आहेत. उन्हाच्या तीव्र लाटांमुळे दरवर्षी हजारो लोकांचा मृत्यू होत असल्याच्या घटना जगभर समोर येत आहेत.

भारतासारख्या उष्णकटिबंधीय देशात ही परिस्थिती अधिक गंभीर आहे. शहरांमध्ये वाढते काँक्रीटीकरण, झपाट्याने कमी होणारी झाडे आणि उष्णता साठवून ठेवणार्या इमारतींमुळे अर्बन हीट आयलंडचा परिणाम अधिक तीव्र होत आहे. दिवसभर तापलेले शहर रात्रीही थंड होत नाही. परिणामी वृद्ध, लहान मुले, गर्भवती महिला, रस्त्यावर काम करणारे मजूर आणि गरीब वस्त्यांमध्ये राहणार्या नागरिकांचे आरोग्य अधिक धोक्यात येते.

हवामान बदलामुळे संसर्गजन्य आजारांचे स्वरूपही बदलत आहे. वाढलेले तापमान आणि आर्द्रता डासांच्या वाढीला पोषक ठरत असल्याने डेंग्यू, चिकुनगुनिया, मलेरिया आणि झिका यांसारख्या रोगांचा प्रसार नवीन भागांपर्यंत होत आहे. पूरस्थितीनंतर दूषित पाण्यामुळे जलजन्य आजारांचा उद्रेक होतो. बदलत्या हवामानामुळे अन्नधान्य उत्पादनावर परिणाम होत असल्याने कुपोषण आणि अन्नटंचाईसारख्या समस्याही अधिक गंभीर बनण्याची शक्यता आहे.

वायू प्रदूषण आणि हवामान बदल हे मुद्दे एकमेकांशी घट्ट जोडलेले आहेत. जीवाश्म इंधनाचा वाढता वापर, वाहनांची वाढती संख्या, औद्योगिक उत्सर्जन आणि जंगलातील आगी यामुळे वातावरणातील प्रदूषण वाढत आहे. त्याचा परिणाम दमा, फुफ्फुसांचे विकार, हृदयविकार, कर्करोग आणि स्ट्रोकसारख्या आजारांच्या वाढत्या प्रमाणात दिसून येत आहे. भारतातील अनेक शहरे आज जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांच्या यादीत आहेत. हे चित्र केवळ पर्यावरणीय नव्हे, तर आरोग्यविषयक आणिबाणीचे आहे.



हवामान बदलाचा परिणाम मानसिक आरोग्यावरही होत असल्याकडे तुलनेने कमी लक्ष दिले जाते. नैसर्गिक आपत्तींमुळे घरदार गमावलेले लोक, शेतीचे नुकसान झाल्याने आर्थिक संकटात सापडलेले शेतकरी, रोजगार गमावलेले कामगार आणि सततच्या अनिश्चिततेत जगणारे नागरिक मानसिक तणाव, नैराश्य आणि चिंतेच्या गर्तेत सापडतात. हवामान बदलामुळे निर्माण होणारी असुरक्षितता सामाजिक अस्थैर्यालाही कारणीभूत ठरू शकते.

या संकटामागील सर्वात मोठे कारण मानवी विकासाचे विद्यमान मॉडेल आहे. औद्योगिकीकरण, अतिरेकी शहरीकरण, जंगलतोड आणि जीवाश्म इंधनावर आधारित अर्थव्यवस्था यामुळे हरितगृह वायूंचे उत्सर्जन अभूतपूर्व पातळीवर पोहोचले आहे. विकासाच्या नावाखाली सातत्याने होणारा निसर्गाचा ऱ्हास आज मानवालाच महागात पडत आहे. विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष नसून समतोल आवश्यक आहे, हे वास्तव आपण खूप उशिरा स्वीकारत आहोत.

विशेष म्हणजे हवामान बदलासाठी सर्वाधिक जबाबदार असलेले विकसित देश आणि त्याचे सर्वाधिक दुष्परिणाम भोगणारे विकसनशील देश यांच्यात मोठी विषमता आहे. औद्योगिक क्रांतीपासून प्रचंड प्रमाणात कार्बन उत्सर्जन करणार्या राष्ट्रांची जबाबदारी अधिक असली, तरी हवामान बदलाचा सर्वाधिक फटका भारत, आफ्रिका आणि लहान बेट राष्ट्रांना बसत आहे. त्यामुळे हवामान न्यायाची संकल्पना आज अधिक महत्त्वाची ठरत आहे.

भारताने नवीकरणीय ऊर्जेला प्रोत्साहन, हरित हायड्रोजन, इलेक्ट्रिक वाहने, कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि वृक्षलागवड यांसारख्या अनेक महत्त्वाच्या उपक्रमांना गती दिली आहे.

सौर ऊर्जा निर्मितीमध्ये भारताने उल्लेखनीय प्रगती केली आहे; मात्र देशाची वाढती लोकसंख्या, वेगाने वाढणारे शहरीकरण आणि ऊर्जा गरजा लक्षात घेता ही वाटचाल अधिक वेगाने करावी लागणार आहे. शहरांच्या विकासाचा पुनर्विचार करणे ही काळाची गरज आहे.

काँक्रीटच्या जंगलांऐवजी हरित क्षेत्रे वाढविणे, पावसाचे पाणी साठविणे, जलाशयांचे संरक्षण, नैसर्गिक नाले जपणे आणि सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य देणे या उपाययोजना पर्याय राहिलेल्या नाहीत; त्या अपरिहार्य बनल्या आहेत. प्रत्येक शहराने हवामान बदलाशी जुळवून घेण्यासाठी स्वतंत्र कृती आराखडा तयार करण्याची आवश्यकता आहे. कृषी क्षेत्रातही मोठे बदल अपेक्षित आहेत. बदलत्या हवामानाला तोंड देणार्या पिकांच्या जाती, सूक्ष्म सिंचन, जलसंधारण, हवामानावर आधारित कृषी नियोजन आणि शेतकऱ्यासाठी प्रभावी हवामान सूचना प्रणाली विकसित करावी लागेल. अन्यथा, अन्नसुरक्षेचे मोठे संकट निर्माण होऊ शकते.

हवामान बदलावर नियंत्रण मिळविण्यासाठी शासनाच्या धोरणांइतकीच नागरिकांची भूमि काही महत्त्वाची आहे. विजेचा संयमी वापर, सार्वजनिक वाहतुकीला प्राधान्य, सायकल आणि पायी चालण्याची सवय, प्लॅस्टिकचा कमी वापर, कचर्याचे वर्गीकरण, पाण्याची बचत आणि वृक्षसंवर्धन या छोट्या वाटणार्या कृतींचा मोठा परिणाम होऊ शकतो. पर्यावरण संरक्षण ही केवळ सरकारी यंत्रणांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची जीवनशैली बनली पाहिजे त्यासाठी शालेय शिक्षणापासून पर्यावरण साक्षरतेला प्राधान्य देण्याचीही गरज आहे. हवामान बदल ही पुढील पिढीची समस्या नसून आजच्या पिढीचे वास्तव आहे, याची जाणीव लहानपणापासून निर्माण झाली पाहिजे. शाळा, महाविद्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था, उद्योग आणि स्वयंसेवी संस्था यांनी संयुक्तपणे जनजागृतीचे व्यापक अभियान राबविणे आवश्यक आहे.

हवामान बदलाचा मुकाबला करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्यही तितकेच आवश्यक आहे. पॅरिस करारासारख्या जागतिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, हरित तंत्रज्ञानाचे आदानप्रदान, हवामान वित्त आणि विकसनशील देशांना आर्थिक व तांत्रिक मदत या बाबींना अधिक गती देण्याची गरज आहे. कारण हवामान बदलाला सीमा नाहीत, त्याचे परिणामही जागतिक आहेत. आजची वस्तुस्थिती अशी आहे. की, हवामान बदल थांबविणे कदाचित शक्य नसले, तरी त्याचा वेग कमी करणे आणि त्याच्याशी जुळवून घेणे निश्चितच शक्य आहे. त्यासाठी विज्ञानाधिष्ठित धोरणे, राजकीय इच्छाशक्ती, उद्योग क्षेत्राची जबाबदारी आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग या चारही घटकांचा समन्वय आवश्यक आहे.

पर्यावरणाचे नुकसान म्हणजे विकासाची किंमत ही विचारसरणी आता बदलावी लागेल. पर्यावरणाचे संरक्षण म्हणजेच आरोग्याचे संरक्षण, अर्थव्यवस्थेची सुरक्षा आणि भावी पिढ्यांचे भविष्य सुरक्षित करणे होय. आज घेतलेले निर्णय पुढील अनेक दशकांचे भविष्य ठरवणार आहेत. म्हणूनच हवामान बदल हा केवळ वैज्ञानिकांचा किंवा पर्यावरण तज्ज्ञांचा विषय नसून प्रत्येक नागरिकाच्या अस्तित्वाशी निगडित प्रश्न आहे. वेळ अजूनही गेलेली नाही; मात्र ती वेगाने निसटत आहे.

आजही आपण निसर्गाशी संघर्ष करण्याऐवजी सुसंवाद साधण्याचा मार्ग स्वीकारला, तरच भावी पिढ्यांना सुरक्षित, निरोगी आणि शाश्वत पृथ्वी देणे शक्य होईल. अन्यथा, हवामान बदलाची किंमत केवळ पर्यावरणालाच नव्हे, तर संपूर्ण मानवजातीला चुकवावी लागेल.

गेल्या काही वर्षांमध्ये हवामान बदल हा केवळ पर्यावरणाचा विषय राहिलेला नाही तर मानवी आरोग्याशी थेट निगडित असलेला गंभीर प्रश्न बनला आहे. (पान ६ वर)

पान १ वरून

## जाईन गे माये तया पंढरपुरा...

हेच अशा उदाहरणांमधून समोर येते. समाजामध्ये निकोप वातावरण निर्माण करण्यासाठी अशा विचारांचा फार मोठा उपयोग झाला आणि यापुढेही करून घेता येईल. जातिपातीचा, कर्मकांडाचाविचार न करता विठ्ठलभक्तीसाठी एकत्र येण्याचा संस्कार वारीने आपल्याला दिला आहे. म्हणूनच ही संस्काराची वारी आहे. इथे प्रत्येक जण एकमेकांना 'माउली' म्हणूनच हाक मारतो. विठाई माउली आणि ज्ञानेश्वर हीदेखील माउलीच... 'क्रोध अभिमान गेला पावटणी' असे तुकाराम महाराज म्हणतात तेव्हा वाळवंटी मांडलेल्या खेळात आम्ही केवळ मातीच तुडवली नाही तर राग, अभिमान तुडवला, असे ते स्पष्ट करतात. त्यामुळेच- '**एक एका लागतीय पायीं रे...**' असे दृश्य दिसते. इथे कोणी कोणाचे शिक्षण, रंगरूप, वय असे काहीही पाहात नाही. सगळे एकमेकांना नमस्कार करतात. पाया पडतात. तुकोबांनी भक्ताची वेशभूषा कशी असते हेदेखील सांगितले आहे. 'गोपी चंदन उटी तुळशीच्या माळा हार मिरविती गळा।' असे वर्णन ते करतात.

वारकऱ्यांची ही एक महत्त्वाची ओळख आहे. गोपी चंदनाची उटी लावलेल्या व्यक्तीवर वाईट आज्ञांचा प्रभाव पडत नाही. पुढे ते-

'**वर्ण अभिमान विसरती याती एकएकां लोटांगणी जाती।**'

असे म्हणतात. यावेळी वर्ण हा शब्द कार्यवाचक म्हणून घेतला तर लोक आपला वर्ण विसरले नाहीत, पण त्याचा अभिमान विसरले, असेच तुकोबा स्पष्ट करतात. म्हणजेच मी हे काम करतो म्हणून तुझ्या वर आहे आणि तू हे काम करतो म्हणून माझ्यापेक्षा खालच्या पायरीवर आहे, हा विचार वा ही भावना विसरणे हे वारीचे संस्कार आहेत, असे म्हणायला हरकत नाही. इथे सगळेच एकसमान असतात.

'**निर्मळ चित्तें जालीं नवनीतें, पाषाणा पाझर सुटती रे**'

असे म्हणताना तुकोबांनी वारीमुळे भाविकांची, वारकऱ्यांची चित्ते लोण्यासारखे मऊ व्हावीत, अशी इच्छा व्यक्त केली आहे. असे झाले तर आपण एवढे कठोर का राहिलो, असे वाटून तिथल्या दगडांनाही पाझर फुटल्याखेरीज राहणार नाही, अशी भावना ते व्यक्त करतात. वारी अशीच आहे. वाळवंटात खेळ रंगताना, सावळ्या रूपाचे दर्शन घेताना, कळसाला नमस्कार करून माघारी फिरताना प्रत्येकाच्या मनात संमिश्र भावनांचा कोळ असतो आणि पुढल्या वर्षी इथेच भेटण्याची आस असते. आजचा दिवसही त्यातील एक...

## जेथे जातो तेथे। छंद माझ्या संग।

परवा एका मित्रानं फोनवरून विचारलं, घरात बसून तुला कंटाळा येत नाही का? मी म्हटलं, नाही. इतर गप्पा करून फोन खाली ठेवला. लगेच माझा दिनक्रम माझ्या डोळ्यासमोरून जाऊ लागला. माझ्याकडे असलेल्या गौतम बुद्धांवरील चरित्रांपैकी एक मी उचलतो आणि वाचू लागतो. संघर्षकाळात त्यांनी पायदळी तुडवलेली जंगलं, नदी, डोंगर, शहरं त्यांच्याबरोबर मी तुडवू लागतो. थंडीवाऱ्यात, पाऊसपाण्यात, उन्हातान्हात त्यांनी केलेला प्रवास वाचण्यात मी तल्लीन होतो. त्यांची सहनशक्ती, शिस्त, एकाग्रतेने ध्येयाप्रत जाण्याचा त्यांचा स्वभाव यानं मी स्तंभित होतो. श्रद्धेने पुस्तक खाली ठेवतो. भगवंताचे नावही न घेता असंख्य भिक्षूंना भगवत्तेकडे नेणार्या त्या माहात्म्याच्या पाय पडतो आणि पुस्तक मिटतो. माउली म्हणजे डोळ्यात पाणी, काळजात धडधड, अंगावर शहारे! तिच्या आजूबाजूला असणारे बहुतेक साधुसंत तिच्यापेक्षा मोठे. तरीही ती माउली! यातच सगळं आलं.

मिसरूडही न फुटलेल्या वयात तिनं लिहिलेली ज्ञानेश्वरी श्रद्धेने हाती घेतो. उघडून वाचू लागतो... मंदिराचा प्रशांत परिसर, समोर बसलेली मोठमोठी संत मंडळी, गावकर्यांची गर्दी, समईच्या मंद प्रकाशात पैसाच्या खांबाला टेकून बसलेले ते तेजस्वी बालक, त्याच्या परा वाणीतून बाहेर पडणारी ती मंत्रवत शब्दसुमनं...! गर्दीच्या शेवटी कुठेतरी, अवघ्या देहाचा कान करून मी तिला अंतरात्म्यात साठवतोय, असं मला नेहमीच वाटत आलंय. साताठशे वर्षांनंतरही तसूभरही कमी न झालेला त्या शब्दसुमनांचा स्वर्गीय दर्वळ! अवघा देह शांतरसातून निथळून निघाल्यासारखा! वाचनसमाधीतून बाहेर आल्यानंतर काळजातील धडधड हळूहळू कमी करत, आलेल्या शहार्यांना शांत करीत, डोळ्यातील पाणी मागे सारत पूर्ववत होत ग्रंथ मस्तकाला लावत खाली ठेवतो.

अध्यात्माच्या वाचनातून थोडा विरंगुळा म्हणून मग विनोदात शिरतो. वेदनेवर विनोदासारखे औषध नाही म्हणतात. पुलंचं 'बटाट्याची चाळ' समोरच असतं. कुठलंही पान उघडून वाचायला लागा. हास्याचा धबधबा! सगळेच लेख अप्रतिम. त्यातल्या त्यात राघुनानाची कन्येस पत्रे, उपास, भ्रमण मंडळ काही वासर्या खतरनाक! मैत्रमधील केसरबाई, बेगम अख्तर यांची व्यक्तिचित्रं मनाला हळवं करतात. व्यक्ती आणि वल्ली, गणगोत, असा मी असामी... किती नावं घेऊ? कुठूनही, कितीही वेळा वाचा. लिहावं तेवढं थोडंच. बरं, वाचून कंटाळा आला की, युट्यूब आहेच. युट्यूब म्हणजे खजिनाच! फरिदा खातुमचं 'आज जानेकी जिद ना करो' कितीही वेळा ऐका. मेहंदी हसनचं 'रंजीश ही सही', धुवा, बेगम अख्तरची 'मेरे हमनफज मेरे हमनवाज', 'वो जो हममें तुममे करार था ऐ मोहोब्बत' ही सारी अजरामर गाणी ऐकून मन भरतच नाही. गुलाम अली, नुसरत फतेह अली खानपासून भीमसेन जोशींपर्यंत हवं ते ऐका आणि आपल्या वेळेनुसार. परत हिंदी गाण्यांचा खजिना आहेच. किती लिहावं त्यावर! जुनी गाणी ऐकून तर मन तुडुंब भरतं. लता, आशा, रफी, मुकेश, किशोर, मन्ना डे, तलत! आस्क अँड दाउ शाल रिसिव्ह, सिक अँड दाउ शाल फाईंड अशी अवस्था. पुढारलेलं तंत्रज्ञान आपल्याला किती आनंद देऊ शकतं, ओशोंचे व्हिडिओ, ऑडिओ, पुस्तकं तर खच्चून भरलेली. बुद्धापासून कबिरापर्यंत, उपनिषदापासून बायबलपर्यंत, गीतेपासून सुफी, झेनपर्यंत केवढी मोठी रेंज! त्यांचं व्यक्तिमत्त्व, डोळे, कपाळ, आवाज!! मी त्यांना प्रत्यक्ष बर्याचदा ऐकलंय. त्यांचे विचार, विषय सोप्प्या पद्धतीनं समजावून सांगण्याची पद्धत सारंच भारावून टाकणारं! त्यांचं कुठलंही पुस्तक कधीही कुठूनही वाचा. वेगळ्याच दिशेला नेणारं अर्थबोधन! जीव रमवण्याची, समृद्ध होण्याची ही काही वानगीदाखल दिलेली उदाहरणं. ज्याला छंद आहेत त्याला एकटेपण कधीच स्पर्श करणार नाही, याची मला खात्रीच नाही तर तो माझा अनुभव आहे. शेवटी, जेथे जातो तेथे। छंद माझ्या संग। जीवनात रंग भरतात हेच खरं!

**अशोक गुप्ते**

ललित **डॉ. नटचंद्र चिमोटे**

## पावसावर पहारा ठेवणारा : ग्रेस!



पहाटे किंवा सकाळी कधीतरी जाग आली. खिडकीतून सुस्त वारा समोरच्या भिजलेल्या गुलमोहराच्या बारीक बारीक पानांवरून उगाच मंदमंद वाहात होता. दाटलेल्या आभाळातून पडणार्या पावसाचे चार दोन थेंब खिडकीच्या काचेवर ओघळत राहिले. समोरची जर्द लाल फुले मलूलपणे अस्फूट हसल्याचा भास झाला. त्यांना पाहून मी ही कसनूसा हसलो. काळोख दाटल्या त्या अंधूक प्रकाशात तपकीर काळसर पंखाची फडफड झाडाच्या सांदीपानातून कानावर पडला.

हलकेच कानोसा घेता घेता मोठ्ठासा भारद्वाज लपताना दिसला. तो शुभलक्षणी पक्षी पाहून त्याक्षणी मात्र का कोण जाणे, हातात छाटी घेऊन एका पायावर नाचणार्या गोसावड्याचा राग मबैरागीफ आठवला. मन उदाससे झाले. सोबतीने पावसाची कविता म्हणणारा ग्रेसही आठवला...

**पाऊस कधीचा पडतो,**
**झाडांची हलती पाने**
**हलकेच जाग मज आली,**
**दुःखाच्या मंद सुराने**

सगळ्याच सकाळी मंगलमयी असतात असं नसतं. आदल्या दिवसाचं काहूर रात्रभर वटवाघळासारख्या घिरट्या घालत असते. ग्रेस कदाचित त्याच भ्रमंतीत असतील कां? त्याच्या श्रुतीतून उदासपणे वावरणारा कोमल गंधार मनातल्या मनात रुंजी घालत असावा बहुदा! त्याला दुःखाचे मंद सूर जागवले असावेत. तो दुर्बोध कधीच नव्हता.

आपला मुलगा विलासखानच्या मरणाची खबर ऐन मैफलीत ऐकल्यावर तोडी गाणारा तानसेन चुकून अचानक पंचम लावतो तसा तो ग्रेसला जाणवला असावा. त्याला दुःखाचा मंद सूर ऐकू आला. गाणेच बदलून गेले हो!

दुःखच ते. डोळ्यात पाणी तरळणारंच की! त्या लपवण्यासाठी पाण्यात डोळे फिरवावेत. चार्ली चॅप्लिनने म्हटलं होतं, मला पावसात चालायला खूप आवडतं. कारण पावसात माझे अश्रू कोणीच पाहू शकत नाही. ग्रेस असाच होता नाही?

**डोळ्यात उतरले पाणी,**
**पाण्यावर डोळे फिरती**
**दुःखाचा उतरला पारा,**
**या नितळ उतरणी वरती**

पाऊस खरंच किमयागार आहे. रागमालिकेची झुंबड लावतो.. डोळ्यातले अश्रू लपवण्यासाठी! ग्रेसला नेमके हेच अभिप्रेत होते. टपटपणाऱ्या पाऊस थेंबात नको नको म्हणणार्या चाफ्याच्या शुभ्र सोनेरी फुलांमध्ये थंडाव्याची काप काप होताना तो उजळेलंच कसा? पावसातल्या या चाफ्याला भैरवाचे फक्त कोमल स्वर स्पर्श करतात आणि ग्रेस लिहून जातो..... पेटून कशी उजळेना, ही शुभ्र फुलांची ज्वाला तार्यांच्या प्रहरापाशी पाऊस असा कोसळला. पहाट ताऱ्यांचा प्रहर लुप्त अरुणिमेच्या आड हरवून जाताना मेघाच्छित आभाळ फक्त कोसळत राहते. पहाटेचा मल्हार असाही असतो. संपृक्त मातीला नको नको करत असतो. त्याचा अतिवर्षाव होऊ नये म्हणून करुणा भाकल्या. भटीयारी धून म्हटली.

ललतचा जोगी बनून काळ्या ढगांना दूर पळा म्हणून आवाहन केले. पण तो मजौनपुरीचाफ वारा पळापळीच्या ढगांना आवरत नव्हता. ते जमतच गेले. तीव्र मध्यमाच्या आक्रोशाने ते आकाशात मियाँकी तोडी गात गात मनाचा थांग ढवळत गेले.

मग तो बरसतच राहिला. आता ग्रेस त्याच्या घराच्या कुंपणाला कुलूप लावून अलोट वृष्टीच्या पावसाला आवर घालू पाहतोय.... संदिग्ध ढगांच्या ओळी आकाश ढवळतो वारा माझ्याच किनाऱ्यावरती लाटांचा आज पहारा.

कीर्तिरूपांच्या आठवकथा
डॉ. रमा गोळवलकर

# हरिश्चंद्र



दादासाहेब फाळकेकृत 'राजा हरिश्चंद्र' या भारतातील पहिल्या लांबीच्या मूक चित्रपटातील एक दृश्य

राजा मनूनं सरयू नदीच्या तीरावर कोसल राज्याची राजधानी म्हणून अयोध्या नावाच्या नगरीचं निर्माण केलं. त्याच्या इक्ष्वाकू नावाच्या मुलाकडे कोसल राज्याचं राजेपद सोपवण्यात आलं. त्याच्या ३७ व्या पिढीत जन्माला आलेला हरिश्चंद्र भविष्यात अयोध्येचा राजा झाला. इक्ष्वाकू राजाचा वाय क्रोमोझोम त्याच्यातही होताच. त्यामुळे त्याचा पिंडही त्याच गुणधर्माचा होता. राजा म्हणून प्रजेचं पोटच्या मुलांसारखं पालन करणं, राज्य कारभार चोखपणे करणं, युद्धाचा प्रसंग उद्भवू नये म्हणून सर्वांशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवणं. यदाकदाचित युद्ध करण्याची वेळ आलीच तर रणभूमीवर अतुलनीय पराक्रम गाजवणं हे सारं ओघानं आलंच.

इक्ष्वाकू वंशाच्या राज्यकर्त्यांचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ज्या न्यायासनावर बसून न्याय करायचा त्याच्या उजव्या बाजूला तागडी (तराजू) आणि डाव्या बाजूला मत्स्य (मासा) ही चिन्हं शीर्षस्थानी असलेले दोन उंच दंड सर्वांना दिसतील, असे उभारलेले ठेवायचे. त्यातली प्रतीकात्मकता अशी की, न्यायदान करताना पक्षपात केला जाणार नाही. सारं कामकाज कल्याण करण्याच्या उद्देशानं अगदी तोलून मापून होईल. अनाथ, विधवा, वृद्ध, आजारी आणि स्वतःचे रक्षण न करू शकणार्या दुर्बल घटकांचे रक्षण हे राजाचं प्रमुख कर्तव्य असेल, याची विशेष काळजी घ्यायची.

प्राचीन भारतात माशाचे चिन्ह (मत्स्य) निष्पक्ष न्यायदान, विपुलता आणि दूरदृष्टीचे प्रतीक म्हणून स्वीकारलं होतं. कितीही खोल पाण्यात राहिला तरी मासा जसा कधीच अस्वच्छ नसतो. जलाशयातील लाटा, प्रवाह किंवा इतर बाह्य घटकांचा त्याच्या पोहण्यावर काहीही परिणाम होत नाही, तसंच न्यायदान करताना न्यायाधीशानं कोणत्याही मोहाला, स्वार्थाला, दबावाला बळी न पडता निष्पक्ष भूमिका घ्यावी. त्याचप्रमाणे माशांना पापण्या नसतात. त्यामुळे ते कधीही डोळे मिटत नाहीत. म्हणजेच तो सतत सतर्क असतो. न्यायाधीशांनीदेखील खटल्यादरम्यान आणि सुनावणीत अत्यंत जागरूक, सतर्क आणि सूक्ष्म निरीक्षण करावे, असा याचा अर्थ होतो...

तिसरा आणि शेवटचा बिंदू म्हणजे महर्षी मनूंनी अर्घ्य देताना ओंजळीत आलेल्या लहानशा माशाला इतर सर्व भक्षक प्राण्यांपासून वाचवलं. त्याच्या वृद्धी, प्रगती, उन्नती आणि विकासासाठी आवश्यक असलेली संधी त्याला देऊ केली. त्याचाच पुढे देवमासा झाला. त्यानं प्रलयकाळात मनू आणि त्यांनी सोबत घेतलेल्या सर्वांचं रक्षण केलं. समाजातल्या दुर्बलांचं शोषणापासून रक्षण करतो, त्याला सबल होण्यासाठी योग्य मार्गर्शन आणि संधी देऊ करतो तो न्याय, असं सूत्र यातून मांडलेलं आहे. हे सारं राजा हरिश्चंद्राच्या राज्यात तंतोतंत होत होतं. त्याहून महत्त्वाचं म्हणजे राजा हरिश्चंद्राची माता सत्यवती आणि पित्याचं नाव होतं राजा सत्यव्रत (द्वितीय). हाच नंतर त्रिशंकू म्हणून ओळखला गेला.

शिबीराजाची कन्या तारामती त्याची पत्नी आणि या दोघांच्या पुत्राचं नाव रोहित. हरिश्चंद्र हा खर्या अर्थानं सत्यव्रती होता. त्याच्या तोंडून निघालेला शब्द हा खराच असेल किंवा तो खरा होईल यासाठी तो आपली सगळी शक्ती, बुद्धी, कौशल्य आणि प्रयत्न पणाला लावत असे. त्याच्या सत्यव्रती असण्याची परीक्षा पाहण्यासाठी ब्रह्मर्षी विश्वामित्रांनी एका रात्री त्याच्या स्वप्नात येऊन दानात त्याचं राज्य मागितलं. दान मागितल्यानंतर नाही म्हणायचं नाही हे देखील त्याचं एक व्रत होतं. त्याचं पालन त्यानं स्वप्नातदेखील केलं. ब्रह्मर्षीना दानात राज्य देऊन टाकलं.

दुसर्या दिवशी ब्रह्मर्षी विश्वामित्र साक्षात त्याच्या राजसभेत आलेत आणि स्वप्नात दिलेल्या दानाची त्याला आठवण करवून देते झाले. क्षणाचाही विलंब न लावता सत्यवादी राजा हरिश्चंद्रानं त्याचं सारं राज्य ब्रह्मपना देऊन टाकलं. दान स्वीकारणार्याला दानासोबतच ते दान स्वीकारून पुण्य मिळवण्याची संधी देऊ केल्याबद्दलची दक्षिणा क्रमप्राप्त आहे, असं ब्रह्मर्षीनी सांगितलं. पण हरिश्चंद्राकडे आता एक कपर्दिकही उरला नव्हता. परिणामी शेजारच्या काशी राज्यात जाऊन तिथे पट्टराणी तारामती आणि युवराज रोहिदासाला एका ब्राह्मणाला आणि मणिकर्णिका घाटावर दहनक्रिया करणार्या डोंब राजाला स्वतःला विकून ते द्रव्य दक्षिणा म्हणून विश्वामित्रांना दिलं.

या राजपरिवाराची परीक्षा इथेच संपत नाही. वर्षाकाळ संपत आल्यानंतर अचानक वातावरण तापू लागतं. जवळपास वीसेक दिवस तो कृत्रिम उन्हाळा असह्य व्हावा इतका तापतो. त्यात ती तिघे पाण्याअभावी तडफडतात. आजही भाद्रपदात वर्षा ऋतू संपून सुरू होणारा शरद ऋतू आधी चांगलाच तापतो. त्याला आधुनिक काळात मऑक्टोबर हीटफ म्हणत असले, तरी जुनेजाणते मात्र याला विश्वामित्री उन्हाळा म्हणत.

हरिश्चंद्र स्मशानात कर गोळा करण्याच्या कामावर असतो तर तारामती रोहिदास ब्राह्मणाकडे काबाडकष्ट करीत असतात. अजूनही विश्वामित्रांच्या मनाचं समाधान झालेलं नव्हतं. त्यामुळे रोहित सर्पदंशानं मरतो. त्याच्या प्रेताचं दहन करण्यासाठी तारामती स्मशानात येते; पण तिच्याकडे कर द्यायला पैसे नसतात. हरिश्चंद्र तिला रोहितचं प्रेत स्मशानात आणू देत नाही.

अखेर स्वतःच्या वस्त्राचा काही भाग कर म्हणून दिल्यावरच रोहितच्या प्रेताचं दहन करण्याची परवानगी तो देतो. पोटच्या पोराच्या मृत्यूचं दुःख बाजूला सारत हरिश्चंद्राचा हा सगळा निःस्पृह व्यवहार म्हणजे काया-वाचा-मनानं साधलेली सत्याच्या व्रताची परमावधी होती. त्यामुळे सर्व देवी-देवता आणि विश्वामित्रादि ऋषींच्या आशीर्वादानं रोहित पुनर्जीवित झाला. सोबतच अयोध्यानगरीसह कोसल देशाचं राज्यसुद्धा त्याला परत मिळालं. असा हा राजा श्रीरामांचाही पूर्वज होता.

हरिश्चन्द्राची ही कथा अस्सल भारतीय मातीतली आहे. कारण आपल्या व्रताच्या पूर्तीसाठी राज्य कारभार सोडून देणारे राजे केवळ भारतातच होऊन गेले आहेत. त्यामुळे भारतीय चित्रपटसृष्टीची पायाभरणी करणाऱ्या दादासाहेब फाळकेंना या हरिश्चन्द्राची कथा फार भावली. त्यांनी त्याच्या सत्यप्रियतेचं चित्रण पडद्यावर साकारलं. तोच भारताचा पहिला पूर्ण लांबीचा चित्रपट मराजा हरिश्चंद्रफ (१९१३)!

प्रभात फिल्म कंपनीनं पहिला मराठी बोलपट बनवला. त्याचं नाव अयोध्येचा राजा (१९३२)! दृश्यसंवादाचा आणि दृक्श्राव्य संवादाचे हे नवे प्रवास सुरू करताना या चित्रमहर्षींना सत्यवादाचा निस्सीम पुरस्कर्त्या राजा हरिश्चंद्रच आठवावा, याचं मूळ सत्यमेव जयते या भारताच्या ब्रीदवाक्यात आहे. तर, अशा या ईक्ष्वाकू वंशीय अयोध्येच्या राजा हरिश्चंद्राची आठव कथा.

बोली आणि संस्कृती
प्रा. अजय देशपांडे

# वारी : सामुदायिक सदाचाराचे सांस्कृतिक वैभव

वारी या बोलीतील शब्दाचा सांस्कृतिक आणि सामाजिक अर्थ मौलिक आहे. वारी हे जागतिक पातळीवरचे भारताचे वैशिष्ट्य आहे. महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव आहे. वारी ही पायी चालणाऱ्या माणसांच्या मनातील सामुदायिक समतेचा आणि ममतेचा जागर करण्याचा महाराष्ट्राचा आनंदसोहळा होय. वारकरी संप्रदायाचे प्रवर्तक संत नामदेवांनी अभंग या छंदाचे निर्माण केले. संत नामदेव तत्त्वचिंतक होते. वारीच्या माध्यमातून मानवतेची मोठी चळवळ नामदेवांसह वारकरी संतांनी निर्माण केली. या चळवळीचे तत्त्वज्ञान आणि आचारसंहिता ही अभंगांच्या माध्यमातून संत नामदेव आणि त्यांच्या सोबतच्या व नंतरच्या संतांनी निर्माण केली. अवघाची संसार करीन सुखाचा या शब्दांतून भारतासह जगातील सर्व मानवी समूहाला सुखी करण्याची ध्यासमग्र कृतिशीलता अभिव्यक्त झाली आहे.

वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राला नीतिमत्तेचा संस्कार दिला. माणुसकीच्या अभंग मूल्यावर प्राणपणाने निष्ठा ठेवणारा विचार दिला. वारी हा सामुदायिक एकात्मतेचा सामूहिक सोहळा होय. तो भक्तिप्रधान असेलही; पण समाजाच्या नैतिकतेची, सामुदायिक सदाचाराची शिकवण देणाऱ्या वारीचे सांस्कृतिक एकात्मतेच्या दृष्टीने महत्त्व अनन्यसाधारण आहे. नीतिमत्ता आणि कृतिप्रवणेचा समन्वय साधणारी जीवनप्रणाली वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राला दिली. मानवतेचा विचार मौलिक आणि शाश्वत आहे, ही शिकवण वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राला दिली... नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी, अवघाची संसार करीन सुखाचा हे नामदेवांचे शब्द आणि पराचिया नारी रखुमाई समान, मजे का रंजले गांजले। त्यासी म्हणे जो आपुले। तोचि साधू ओळखावा। मृदू सबाह्य नवनीत तैसे सज्जनाचे चित्त, कोणाही व घडो मत्सर, तुका म्हणे मना पाहिजे अंकुश, दया तिचे नाव भूतांचे पाळण। आणिक

ज्ञानदेव), माझे माहेर पंढरी (संत एकनाथ), दिवाळीच्या मूळा लेकी आसावली। पाहातसे वाटुली पंढरीची (संत तुकाराम), पंढरपूरला माहेर म्हणण्यात भक्ती आहे, पण त्यापेक्षाही एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, पंढरपुरास जाताना आणि तेथे गेल्यावर ममृदू सबाह्य नवनीत तैसे चित्तफ असणारे जे संतसज्जन भेटतात, त्यांच्या सहवासातून समाजात माणुसकीचा विचार रुजवण्यासाठी प्रयत्न करण्याचे नियोजन करण्यासाठी दरवर्षी वारी! तुका म्हणे तोचि संत। सोसी जगाचे आघात अशा संतांचे पंढरपूर आणि वारी हे माहेर आहे.

लेकराचे हित। वाहे माऊली चित्त। ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभेविण प्रीती। पोटी भार वाहे। त्याचे सर्वस्वही साहे। तुका म्हणे माझे। तैसे तुम्हा संता ओझे।।। ज्याप्रमाणे आई सदासर्वदा आपल्या मुलाच्या हितासाठी प्रयत्न करते त्याची सर्वतोपरी काळजी घेते त्याप्रमाणे संत मातृभावनेने समाजाची काळजी घेतात. रंजल्या गांजल्या मनांना आई होऊन भेटलेले संत हे व्यक्ती आणि समाज दोहोंसाठी दया, करुणा, नीती, मानवतेचे माहेर असतात. पंढरपुरात मातृहृदयाचे संत भेटतात, म्हणून ते माहेर! पंढरपुरात मातृहृदयाने समाजसेवा करण्याचा विचार आणि संस्कार दिला. घेतला जातो म्हणून ते माहेर! साधु संत मायबाप तिही केले कृपादान। पंढरीये यात्रेत नेले घडले चंद्रभागे स्नान।। अशा शब्दांत संत ज्ञानदेवांनी वारीतील वैचारिक आदानप्रदानाची महती कथन केली आहे.

सामुदायिक सदाचाराचे मूल्य वाणीच्या माध्यमातून लोकमनात रुजवण्यासाठीची सामाजिक कृती म्हणजे वारी होय. समाजाची नीतिमूल्ये, स्वभाव, विचारप्रणाली घडवण्यासाठी वारकरी संतांनी प्राणपणाने प्रयत्न केले. सामूहिक नैतिकतेसाठी, सार्वजनिक प्रबोधनासाठी संतांनी वाणीच्या माध्यमातून जे मार्ग अवलंबले त्यात वारीचा वाटा फार मोठा आहे. वारी आणि वाणी या दोहोंच्या माध्यमातून संतांनी लोकप्रबोधनाचा प्रयत्न केला. मराठी संतसाहित्याचे आणि वारीतील ओवी, अभंग, भजन, कीर्तन, नृत्य, वाद्ये यांचे अनुबंध लोकसाहित्याशी जुळलेले आहेत. लोकसाहित्य आणि लोकपरंपरेतील प्रतिभा आविष्कारांचा प्रभाव संतसाहित्याने सहज



निर्दाळण कंटकांचे, क्रोध अभिमान केला पावटणी, परस्त्रिया सदा बहिणी या संत तुकारामांच्या या आणि अशा कितीतरी ओळी वाचल्या की, वारकरी संप्रदायाने दिलेल्या नीतिमत्तेच्या संस्कारांची जाणीव होते. वारकरी या शब्दातच वारीचा संस्कार आहे. पायी चालत वारी करणारा तो वारकरी. एकदा वारीत सहभागी झाला की सदाचार हा जगण्याचा बाणा होतो. पंढरपूरला संत माहेर म्हणतात. जाईन ग माये पंढरपुरा। भेटेन माहेरा आपुलिया (संत

स्वीकारला. लौकिक छंद, लोकसंस्थांची परिभाषा आत्मसात करून त्या दृक्- श्राव्यात्मक, नृत्य- नाट्यात्मक काव्यप्रकारांचे उपयोजन वारीच्या प्रवासात ठिकठिकाणी केले. वारीने लोककला जोपासल्या आणि त्यांचा प्रचार- प्रसारही केला. १३ व्या शतकापासून आजतागायत भक्तीसाठी वारी, असा समज असेलही पण, वारीच्या स्वरूप आणि परंपरेत (पान ६ वर)

आकलन
विजय कुलकर्णी

**एकीकडे मैदानी खेळांऐवजी मुलांचे 'स्क्रीन'मध्येच रममाण होणे चिंताजनक ठरत असतानाच, दुसरीकडे डिजिटल कंटेंटमुळे भारतात खेळण्यांची मागणी वाढल्याचा अहवाल नुकताच 'मॅटेल' या जगप्रसिद्ध खेळणी उत्पादक कंपनीने जाहीर केला. त्यानिमित्ताने भारतीय खेळण्यांच्या बाजारपेठेचे हे आकलन...**

# खेळ खेळू चला...



टीव्हीवर अथवा 'युट्यूब'वर एखादे कार्टून बघितल्यानंतर किंवा मोबाईलवर एखादा गेम खेळल्यानंतर साहजिकच लहान मुलांना त्या काल्पनिक पात्रांविषयी एकप्रकारचे आकर्षण निर्माण होते. परिणामी, दुकानांमध्ये, मॉलमध्ये त्याच कार्टूनचे एखादे खेळणे दिसले रे दिसले की, मुलांनी त्यासाठी भोकाड पसरलेच म्हणून समजा. ज्या पात्राशी मोबाईलच्या स्क्रीनवर आपण खेळतो, त्याच्या संवादांवर खळखळून हसतो, तो दुःखी झाला की सहानुभूती दर्शवितो, तेच पात्र प्रत्यक्ष खेळण्याच्या स्वरूपात समोर आले की, त्याच्या खरेदीसाठी मुलांचा पालकांकडे लडिवाळ हट्ट सुरू होतो. हा अनुभव भारतातल्याच नाही, तर अगदी जगभरातील पालकांचाच. पण, 'मॅटेल' या जगप्रसिद्ध खेळणी उत्पादक कंपनीने याच खरेदीच्या पॅटर्नवरून नुकताच एक निष्कर्ष काढला. तो असा की, डिजिटल कंटेंटमुळे भारतात प्रत्यक्ष खेळण्यांची मागणी ही मोठ्या प्रमाणावर वाढली आहे.

मुळात आजच्या काळात मुले मैदानी खेळांपेक्षा मोबाईलमध्येच सर्वाधिक काळ डोके खुपसून असतात, ही पालकांची घरोघरी तक्रार. त्यामुळे आपसूकच हातातील खेळण्यांची जागा ही मोबाईलच्या गेम्सने घेतली. खरेतर मुलांच्या या डिजिटल खेळांच्या व्यसनाचा विपरीत परिणाम खेळण्यांच्या बाजारपेठेवर दिसायला हवा. परंतु, 'मॅटेल'च्या अहवालानुसार, भारतात याउलट परिस्थिती निदर्शनास आली. अशा डिजिटल गेमिंग कंटेंटमुळे खेळण्यांची मागणी घटण्यापेक्षा, हा कंटेट चक्क खेळण्यांची मागणी वाढवणारा ठरला.

डिजिटली दिसणारी ही पात्रे, त्यांच्या कथा यांनी मुलांच्या दैनंदिन जीवनातील खेळण्यांची जागा हळूहळू बळकावलेली दिसते. म्हणजेच, जे कार्टून स्क्रीनवर दिसते, त्याचेच प्रत्यक्ष खेळणेसुद्धा माझ्या हातात हवे, असा हा प्रकार. मग असे पूर्वी होत नव्हते का? तर होतच होते की. अगदी 'ही-मॅन', 'निंजा टर्टल्स', 'पोकीमॉन्स' अशी कित्येक उदाहरणे देता येतील. म्हणजेच काय, तर पूर्वी टीव्हीवरील कार्टून असो वा चित्रपटातील प्रसिद्धीस पावलेले कार्टूनची पात्रं, त्यांचे रूपांतरही नंतर प्रत्यक्ष खेळण्यांमध्ये व्हायचे.

आता फक्त टीव्ही आणि चित्रपटांची जागा डिजिटल कंटेंटने घेतली एवढेच. नुसती जागाच घेतली नाही, तर खेळण्यांची बाजारपेठ विस्तारण्यातही याच डिजिटल कंटेंटने मोठा हातभार लावल्याचे 'मॅटेल'चा अहवाल सांगतो. या परिवर्तनामुळे कंपनीलाही आपल्या व्यवसाय प्रारूपात बदल करण्यास प्रोत्साहन मिळाले. त्यानुसार, आता 'मॅटेल' ही कंपनीसुद्धा पारंपरिक खेळणी उत्पादकाकडून 'बौद्धिक-संपदा' आणि 'मनोरंजन' यांवर केंद्रित असलेल्या ब्रॅण्डकडे वाटचाल करताना दिसते.

'मॅटेल'ने आपल्या खेळण्यांच्या बाजारपेठेसंबंधीच्या अहवालात आणखीन एक मांडलेले निरीक्षणही तितकेच महत्त्वाचे. तसे बघायला गेले, तर खेळण्यांशी खेळण्याचे वय हे अगदी तीन महिन्यांपासून ते १२ वर्षांपर्यंत मानले जाते. पण, 'मॅटेल'च्या अहवालानुसार, वयवर्षे १२ उलटल्यानंतरही कित्येक किशोरवयीन मुले त्यांच्या आठवणींचे जतन करण्यासाठी, 'कलेक्शन' म्हणून संग्राह्य ठेवण्यासाठीही खेळणी खरेदी करतात. जागतिक खेळण्यांच्या बाजारपेठेत अशा किशोरवयीन ग्राहकांचे प्रमाण हे २७ टक्के इतके असून, दरवर्षी हेच प्रमाण १२ ते १३ टक्क्यांनी वाढत असल्याचा अंदाजही 'मॅटेल'ने वर्तविला आहे. म्हणजे एकूणच काय, तर लहान असो अथवा किशोरवयीन मुले, त्यांच्या खरेदीमुळे खेळण्यांच्या बाजारपेठेला सुगीचे दिवस आलेले दिसतात. यानिमित्ताने खेळण्यांच्या भारतातील वाढत्या मागणीमागील ठोस कारणेही समजून घ्यायला हवीत.

पहिले आणि सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे, तरुणांची वाढती लोकसंख्या. त्यामुळे साहजिकच लोकसंख्येच्या दृष्टीने जगातील प्रथम क्रमांकाच्या आपल्या देशात खेळण्यांच्या विक्रीचाही आलेख चढता आहे. त्याचबरोबर पालकांची वाढलेली क्रयशक्ती, घरबसल्या एका क्लिकवर खेळणी ऑर्डर करण्याची उपलब्ध झालेली सोय, मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना देऊ शकतील अशी शैक्षणिक खेळणी; परवानाप्राप्त, तसेच पारंपरिक खेळण्यांना मिळणारी पसंती, ही खेळण्यांच्या वाढत्या मागणीमागील काही ठळक कारणे. हे झाले आताचे चित्र. परंतु, काही वर्षांपूर्वी भारतीय खेळण्यांच्या बाजारपेठेत चिनी बनावटीच्या खेळण्यांचाच सुळसुळाट होता.

अगदी मॉल, दुकाने ते रस्त्यांवर विकल्या जाणाऱ्या खेळण्यांपर्यंत चिनी खेळण्यांची एकच चलती. परंतु, गेल्या काही वर्षांत भारतीय खेळण्यांची आयात घटून, निर्यात कमालीचे वाढल्याचे दिसते. २०१७-१८ मध्ये खेळण्यांची एकूण निर्यात १५२.७ दशलक्ष डॉलर्स इतकी होती.

२०२५-२६ मध्ये ती वाढून ३८४.७ दशलक्ष डॉलर्स झाली, जी १५१.९ टक्क्यांपेक्षा अधिक वाढ दर्शवते. इलेक्ट्रॉनिक आणि नॉन-इलेक्ट्रॉनिक खेळण्यांच्या बाबतीत सर्वाधिक वाढ दिसून आली. कारण, याच कालावधीत त्यांची निर्यात ७७.३५ दशलक्ष डॉलर्सवरून २००.८९ दशलक्ष डॉलर्सपर्यंत, म्हणजेच जवळपास १६० टक्क्यांनी वाढली. या निर्यातवाढीची प्रमुख कारणे म्हणजे, पूर्वीच्या सरकारांनी दुर्लक्षित केलेल्या या क्षेत्राकडे मोदी सरकारने दिलेले विशेष लक्ष.

यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करायचा झाल्यास, National action Plan for Toys (N-PT), २०२०, 'टॉय बीझ' नावाचे आंतरराष्ट्रीय 'बी टू बी' प्रदर्शन, 'आत्मनिर्भर भारता'च्या धोरणाला चालणारे 'टॉयकेथॉन', 'ई-टॉईस लॅब', 'मानकमंथन' नावाचे मानांकन, 'एक जिल्हा-एक उत्पादन'सारखी योजना, खेळण्यांना 'जीआय' टॅग, खेळण्यांवर १२ टक्क्यांवरून पाच टक्के इतका कमी केलेला 'जीएसटी', विविध देशांसोबत झालेल्या मुक्त व्यापार करारांतर्गत भारतीय खेळण्यांची परदेशी बाजारपेठेत सुकर केलेली निर्यात, खेळण्यांच्या निर्यातीच्या दृष्टीने जिल्ह्यांचा विकास करणे यांसारख्या उपाययोजनांचा समावेश आहे. त्यामुळे २०३४ पर्यंत खेळण्यांची भारतीय बाजारपेठ ही तब्बल पाच अब्ज डॉलर्सपर्यंत भरारी घेण्याचा अंदाज वर्तविला जातो.

खरेतर भारतीय खेळण्यांना तब्बल पाच हजार वर्षांचा इतिहास- वारसा लाभलेला. पण, हे क्षेत्र तरीही बहुतांशी असंघटितच. आजघडीला खेळण्यांच्या उत्पादनात चार हजार 'एमएसएमई'चा समावेश असला, तरी अजूनही या क्षेत्रात विस्ताराच्या, विकासाच्या संधी उद्योजकांना खुणावत आहेत. मग ग्राहक म्हणून तुमची-आमची जबाबदारी काय? तर, आपणही स्वदेशीचा पुरस्कार करून भारतीय खेळण्यांच्या या बाजारपेठेला, कामगारांच्या हाताला अधिक बळकट करुया आणि भारतीयत्वाची हीच समृद्ध भावना पुढील पिढीतही रुजवूया!



## घडू दे परत एकदा वारी...

उजळूनी आसमंत सारा निघाली
समभावाची दिंडी भेदभावाची हो
कुठं दिसेना तुम्हा कोंडी चंद्रभागेच्या
तीरी उसळला भक्तीचा सागर हाती
टाळ मृदंग चिपळ्या मुखी विठू
नामाचा गजर लक्ष एकच साऱ्यांचे
विठू दर्शनाची हो आस नयन
भरुनी पाहू सावळे परब्रह्म ते रूप
तुळशी हार गळा नेसूनी पीतांबर
पिवळा कर कटावरी भाळी
चंदनाचा शोभे टिळा गोजिरे रूप
साठवूनी विठ्ठला जाईन म्हणतो
मायारी पुन्हा येईन नव्या बळाने
घडू दे परत एकदा वारी..
घडू दे परत एकदा वारी!!!

मेधा औरंगाबादकर

## माझा पांडुरंग हरी..!

यावी आषाढ पहाळी भाळी थेंब
गोंदवावे, लाल कोवळ्या पिकांचे
ओले अभंग मी गावे!
व्हाव्या सरींच्या पताका निळ्या
केशरी सावळ्या,
धारा रेघोट्या होऊन जरा
नाचाव्या बावळ्या!
पीक झाले वारकरी जणू पाऊली
चालते माथी पाऊस घेऊन पुढे
मागे ते हालते! मोर खेळता
रहावा मनाआत माणसात
अन् ओंजळी हसाव्या दान देत
आनंदात!
एकतारी चिपळ्यांनी राहो गर्जत
पंढरी, शिवारात नांदतो रे
माझा पांडुरंग हरी!

शशी त्रिभुवन

# ग्रहसंकेत

**(रविवार, १९ जुलै ते शनिवार, २५ जुलै २०२६)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार
'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो. कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र.९४२३७५८४०१)

* **रविवार, १९ जुलै-** कुमार षष्ठी, संत श्री गुलाबबाबा पालखी प्रस्थान मौजे रेडा (ता. इंदापूर), श्री यशवंतबाबा पुण्यतिथी कुरोली सिध्देश्वर (ता. खटाव) * **सोमवार, २० जुलै-** पुष्य रवि (सकाळी ११.२८, वाहन-उंदीर), विवस्वत सप्तमी * **मंगळवार, २१ जुलै-** दुर्गाष्टमी, श्री सावळारामबुवा शेजवळ पुण्यतिथी जुन्नर (जि. पुणे), अष्टान्हिक पर्वारंभ (जैन) * **बुधवार, २२ जुलै-** वीर बाजीप्रभू देशपांडे पुण्यदिन, सिंहायन उ.रात्री १२.४२ * **गुरुवार, २३ जुलै-** लोकमान्य टिळक जयंती, मन्वादि, वनसंवर्धन दिन, * **शुक्रवार, २४ जुलै-** श्री विठ्ठल नवरात्रारंभ, श्री जगन्नाथ पुर्यात्रा पुरी, संत दिगंबर महाराज पितळे पुण्यतिथी रोहना (खामगाव) * **शनिवार, २५ जुलै-** देवशयनी आषाढी एकादशी, पंढरपूर यात्रा, चातुर्मास्यारंभ विठ्ठल यात्रा नंदवाळ (ता. करवीर), श्री पांडुरंग जत्रा साखळी.

**मुहूर्तः-** * **साखरपुडा-** १९, २०, २४ जुलै * **डोहाळ जेवण -** १५, १९ (१४ नंतर) जुलै, २० जुलै (१९ पर्यंत), २४ जुलै * **बारसे-** १५ जुलै (१२ नंतर), २० जुलै ***जावळ-** १५ जुलै, २० जुलै * **गृहप्रवेश-** १५, १९, २४ जुलै

### मेष :- श्रद्धा ठेवावी

जे- जे घडेल ते- ते घडो! देह राहो अथवा पडो! पाय हरीचे न सोडी!धनात मंगळ, हर्षल तर व्ययात शनि- नेपच्यून त्यामुळे जे-जे घडेल ते-ते घडू द्यावे, पण देवाप्रमाणेच आपल्या कर्म स्थानावर ही श्रद्धा ठेवावी. आर्थिक बाबतीत बेफिकीर राहू नका. खर्चाचे प्रसंग वाढणार आहेत. फार दगदग करू नका. ग्रहसौख्य लाभेल. कलेचा विकास होईल. शुभ ता. १९, २४

### वृषभ:- मनासारखी प्रगती

महाद्वारी सुख असे या सुखाचे! लागती संतांचे चरणरज! राशीतच मंगळ, हर्षल असल्याने सध्या आहे त्या परिस्थितीत सुखाने रहावे. संत सज्जनांचा सहवास प्रतिकूलतेतूनही आपणास मार्ग दाखवितो. माहिती तंत्रज्ञान, वाहतूक अशा क्षेत्रात अनुकूलता राहील. अंगीकृत कार्यात मनासारखी प्रगती होईल. नव्या संधी विचाराने स्वीकाराव्यात. शुभ ता. १९, २०

### मिथुन:- चिकाटीने प्रगती

सुखाचे हे सुख, श्रीहरी मुख! पाहता ही भूक तहान गेली! राशीत राशी स्वामी बुध असून धनात व्ययात रवि, मंगळ आहेत. त्यामुळे प्रतिकूलतेतही श्रद्धा जोपासावी. प्रशासन, ज्ञानदान, बँक विभाग अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. कार्यक्षेत्रात चिकाटीने रहावे. अपेक्षित घटना घडतील. जामीन कोणास राहू नका. समस्या संभवतात. शुभ ता. २०, २४

### कर्क:- चांगलेच घडत जाईल

माझा भाव तुझे चरणी! तुझे रूप माझे मनी! राशीतील रवि, गुरु आत्मविश्वास वाढवणार आहेत. श्रद्धास्थानी भाव ठेवून निश्चित रहावे. सर्व काही चांगलेच घडत जाईल. आर्थिक स्थिती समाधानकारक राहील. नव्या विचारांना चालना मिळेल. चिकाटीने प्रगती घडेल. गुढ विद्येत प्रगती होईल. अडचणी सुटत जातील. शुभ ता. २०, २४

### सिंह:- जीव म्हणजेच शिव

जीव विठ्ठल! शिव विठ्ठल! आत्मा विठ्ठल! अखंडित! जीव म्हणजेच शिव आहे. आपण कोणीच परिपूर्ण नाही. त्यामुळे कार्यसिद्धीसाठी लहान-थोरांचा विचार न करता मार्गक्रमण करावे. शारीरिक तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. नोकरीत वरिष्ठांशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. शुभ ता. २०, २४

### कन्या:- नव्या विचारांना चालना

तीर्थ विठ्ठल! क्षेत्र विठ्ठल! देव विठ्ठला! देवपूजा विठ्ठल! लाभस्थानात रवि- गुरु असल्याने कार्यक्षेत्रात निश्चित रहावे. स्पर्धांमध्ये यश मिळेल. नव्या विचारांना चालना मिळेल. प्रगतीचा मार्ग मिळेल. अनावश्यक खर्च टाळावा. जनसंपर्कातून मनासारखे घडत जाईल. शुभ ता. १९, २४

### तुला:- अपेक्षित घटना

एक बोल सुस्पष्ट बोलावा! वाचे हरी हरी म्हणावा! राशी स्वामी लाभात केतूस आहे. कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. शारीरिक तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. आर्थिक स्थिती समाधानकारक राहील. नव्या संधीचे स्वागत करावे. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. २०, २४

### वृश्चिक:- रिपूपासून दूर रहावे

सर्वांगे साजिरी आहे ति इंद्रिये! तव सावध तू होय हरी कये! राशी समोरच मंगळ हर्षल आहेत. त्यामुळे सर्व बाबतीत सावध रहावे. कोणत्याही रिपूंपासून दूरच रहावे. समस्या संभवतात. वादविवादाचे प्रसंग टाळावेत. धार्मिक कार्यात पुढाकार घ्याल. नव्या संधी विचारपूर्वक स्वीकाराव्यात. प्रगती होत जाईल. शुभ ता. १९, २०

### धनु:- सदगुण जोपासावेत

उंसाचे शेजारी येरंडाचे झाड! नाही त्याचे पाडें गोडी आली! आपले सद्गुण जोपासावेत, वृंध्दिगत करावेत. छोटी पनोती आहे. त्यामुळे समस्यातून मार्ग निघत जाईल. तामसी आहारापासून दूर रहावे. त्रास संभवतो. हितशत्रूंवर विजय मिळवू शकाल. नव्या योजना विचारपूर्वक स्वीकाराव्यात. शुभ ता. २४

### मकर:- विचाराने रहावे

तुझे निज सुख तुज पाशी आहे! विचारूनी पाहे मना माजी! आपले हित, आपले सुख आपणावरच अवलंबून असते. केवळ चिंता करून कहीच साध्य होत नसते. योग्य मार्गक्रमण आवश्यक आहे. आर्थिक प्रगती विलंबाने का होईना, होत जाईल. संततीशी मतभेदाचे प्रसंग टाळावेत. विचाराने रहावे. शुभ ता. १९, २०

### कुंभ:- घाईने निर्णय नकोत

सद्गुरूंचे पाय जीवें न विसंबावे! मन वळवावे वृत्ति सहित! सुख- स्थानी मंगळ, हर्षल आहे. त्यामुळे आपले स्वास्थ्य बिघडू देऊ नका. कार्यक्षेत्रात विचाराने रहावे. स्थावर प्रश्न वाढवू नका. नोकरी व्यवसायात घाईने निर्णय घेऊ नका. गृहनिर्माण, विधी अशा क्षेत्रात प्रगती घडेल. चिंता करू नका. शुभ ता. २०, २४

### मीन:- उत्साहवर्धक घटना

अवघे ते संसारी जाणावे ते धन्य! ज्यांचे प्रेमपूर्ण पांडुरंगी! राशीत शनि, नेपच्यून तर पंचमात गुरु रवि त्यामुळे निश्चिंत राहून मार्गक्रमण करावे. उत्साहवर्धक घटना घडतील. आहार- विहाराकडे दुर्लक्ष करू नका. चिकाटीने केलेली वाटचाल आता शुभ फलदायी ठरेल. वाहनसोक्त लाभेल. अडचणी कमी होतील. शुभ ता.२०, २४

!! राम कृष्ण हरी !!

पान १ वरून

## अमेरिका आणि इराणमधील युद्ध वर्चस्वाचे!

यांच्याविरुद्ध भ्रष्टाचाराच्या विविध प्रकरणांमध्ये चौकशी लावेल. ट्रम्प यांना पदावरून हटवण्याचेही प्रयत्न होतील. त्यामुळे ट्रम्प यांच्यासाठी खनिज तेलाचे भाव नियंत्रणात असणे आवश्यक आहे. युद्धविराम झाल्यावर अमेरिकेची मर्यादा माहिती असल्यामुळे आखाती देशांनी मोठ्या प्रमाणावर तेलाचे उत्पादन करण्यास सुरुवात केली. संयुक्त अरब अमिरातींनी युद्ध चालू असतानाच ओपेक गटातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला होता. ओपेक सदस्य देश म्हणून ते दररोज सुमारे ३० लाख बॅरल तेलाचे उत्पादन करत होते. आता तेलाचे उत्पादन वाढवून दिवसाला ४५ लाख बॅरलपर्यंत नेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. संयुक्त अरब अमिरातींशी स्पर्धा करणाऱ्या सौदी अरबनेही तेलाच्या किमती कमी करून आशियातील ग्राहकांना बॅरलमागे तब्बल ११ डॉलरची सवलत देण्याचा निर्णय घेतला. ही सवलत युद्धकाळातील किमतीवर असली, तरी प्रत्यक्षात सौदी अरब हा संयुक्त अरब अमिराती आणि ओमानच्या किमतीपेक्षा बॅरलला सुमारे दीड डॉलर कमी किमतीत तेल विकण्यास तयार होता. इराणवरील निर्बंध उठवल्याने इराणचे तेलही बाजारात येऊ लागले. अमेरिका खंडात अमेरिका, कॅनडा, व्हेनेझुएला, ब्राझील आणि गयानासारख्या देशांमध्ये विक्रमी उत्पादन होऊ लागल्यामुळे परिस्थिती अशीच राहिली; तर किमती बॅरलला ४० डॉलरपेक्षा कमी होतील, असा अंदाज वर्तवण्यात येऊ लागला. तेलाच्या एवढ्या कमी किमती इराण आणि अमेरिका या दोन्ही देशांना परवडण्यासारख्या नाहीत. त्यामुळेच युद्धाची ठिणगी पडली असावी, असा अंदाज आहे. युद्ध सुरू झाल्यानंतर दोन्ही देशांनी एक- एक पायरी वरती चढण्यास सुरुवात केली. कतार आणि सौदी अरबने पुढाकार घेतल्यास हे युद्ध थांबू शकेल. प्रत्यक्षात मात्र येमेनमध्ये सौदी आणि इराण समर्थित गटामध्ये यादवी युद्धाचा भडका उडाला आहे. ट्रम्प यांनी नोव्हेंबर २०२६ मधील मध्यावधी निवडणुकांकडे दुर्लक्ष केले, तर अमेरिका हे युद्ध अनेक महिने लढू शकेल. पण, तेलाच्या किमती पुन्हा एकदा १०० डॉलरच्या घरात गेल्यास ट्रम्प युद्धविरामाचा पर्याय निवडतील. दुसरीकडे इराणसाठीही हे युद्ध थांबणे महत्त्वाचे आहे. तेलसमृद्ध आखाती देशांच्या अर्थव्यवस्था युद्धाची झळ सहन करू शकत असल्या, तरी त्यांच्याकडील गृहनिर्माण आणि पर्यटन क्षेत्रांसाठी हे युद्ध लवकरात लवकर थांबणे आवश्यक आहे. या परिस्थितीत अमेरिका आणि इराण यांच्यात पहिले कोण नमते घेतो, ते पाहणे महत्त्वाचे!

पान २ वरून

## बालहक्क; दयेचा नव्हे, तर हक्काचा...

आहे. त्याला संरक्षणाची गरज आहे; त्याचबरोबर सन्मान, सहभाग आणि संधी यांचाही अधिकार आहे. म्हणूनच बालहक्क म्हणजे केवळ एखाद्या कल्याणकारी योजनेचा लाभ नव्हे; तर प्रत्येक मुलाला सुरक्षित, सन्माननीय आणि अर्थपूर्ण बालपण जगण्याची हमी देणारी मानवी सभ्यतेची सामूहिक बांधिलकी आहे. एखाद्या समाजाची खरी प्रगती त्याने आपल्या मुलांच्या हक्कांना किती गांभीर्याने घेतले आहे, यावरच मोजली जाते.

पान ३ वरून

## अल्बेरूनीच्या नजरेतून...


चंद्रायन उपास पद्धतीत पौर्णिमेला पूर्ण उपास करायचा, दुसऱ्या दिवशी मूठभर अन्न घ्यायचे, तिसऱ्या दिवशी त्याहून दुप्पट, तिसर्या दिवशी तिप्पट, असे करीत अमावास्येच्या दिवशी पुन्हा उपवास करायचा आणि पौर्णिमेपर्यंत अन्न कमी कमी करत जायचे. मासोपर्वमध्ये महिनाभर तोंडात तीळही टाकायचा नाही. भारतीय लोकांची धारणा होती की चैत्रात उपवास केल्याने समृद्धी मिळते, वैशाखात माणूस राज्यकर्ता बनतो, ज्येष्ठ महिन्यात स्त्रियांचा लाडका होतो, आषाढात श्रीमंत होतो, श्रावणात शहाणपण शिकतो, भाद्रपदात आरोग्यवृद्धी होते, आश्विनात विजयी होतो, कार्तिक महिन्यात लोकप्रिय होतो, मार्गशीर्षात पुनर्जन्म चांगल्या देशात होतो, पौषात चारित्र्यवान म्हणून प्रसिद्ध पावतो, माघात श्रीमंत होतो आणि फाल्गुनात उपवास केला तर सगळ्यांना अतिशय प्रिय होतो. अल्बेरुनीने केलेले भारतीय समाजमनाचे वर्णन खिळवून ठेवते ते त्यातील साक्षीभावाने!

---

तत्त्वदर्शन

डॉ. राजेंद्र डोळके

# स्वधर्म आणि कर्म, विकर्म व अकर्म



गीतेत कर्माची सांगड स्वधर्माशी घातली आहे. स्वधर्म म्हणजे सहज स्वभाव. मनुष्य तो घेऊनच जन्माला येतो. मनुष्य जन्मला त्याचवेळी त्याचा स्वधर्मही जन्मला. मनुष्याला आई जशी शोधावी लागत नाही, त्याचप्रमाणे स्वधर्मही शोधावा लागत नाही. मनुष्य ज्यावेळी जन्मतो त्यावेळी कोणत्याही प्रकारचे संस्कार न होता त्याच्यामध्ये विशिष्ट गुण प्रतीत होतात. यांनाच जिवाचा स्वभाव म्हणतात. या स्वभावगुणांवरूनच त्या व्यक्तीचा कोणत्या प्रकारच्या कर्माकडे कल अथवा प्रावीण्य आहे, हे कळून येत असते. परिणामतः त्याला आपला आचार निश्चित करावा लागतो. या स्वभावानुरूप आचारालाच स्वधर्म असे म्हणतात.

गुणधर्माच्या वैशिष्ट्यांवरून मनुष्यप्राण्याचे जे चार वर्ग पडले आहेत ते गीतेला संमत आहेत. त्यांनाच वर्ण असे म्हणतात. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे ते चार वर्ण होत. या प्रत्येक वर्णाचा आचारधर्म कोणता व स्वभावनियत कर्म कोणते हेही स्पष्टपणे गीतेत सांगितले आहे. (१८-४१ ते ४४)

**आपुल्या आपुल्या कर्मी दक्ष**
**तो मोक्ष मेळवी** (१८-४५)
**स्व-कर्म - कुसुमी त्यास पूजीता**
**मोक्ष लाभतो** (१८-४६)

या श्लोकांत आपल्या वाट्याला आलेली कर्मे जो चोखपणे बजावतो, तो मोक्षाचा अधिकारी होतो, असे स्पष्टपणे सांगितले आहे. म्हणून मनुष्याने फलाशा सोडून परमेश्वरार्पण बुद्धीने स्वधर्म कर्माचे आचरण करावे यातच त्याचे कल्याण आहे, असे गीता सांगते. (३-३० )

**श्रेयान स्वधर्मो विगुणः**
**परधर्मात स्वनुष्ठितात् स्वधर्मे**
**निधनं श्रेयः परधर्मो भयावहः**

(३-३५) असे गीतेत म्हटले आहे. म्हणजे स्वधर्म आचरताना मृत्यू आला तरी हरकत नाही, परंतु परधर्म भयंकर असल्यामुळे तो कधीच स्वीकारू नये.

शेतकऱ्याला आपोआप लाभलेला स्वधर्म म्हणजे शेती. शेती केल्याने त्याला पोटाला मिळेलच. परंतु पोटाला मिळो अथवा न मिळो तो शेती करेलच. हा स्वधर्म झाला. परंतु दुसऱ्याने पोटाला मिळावे अथवा नफा मिळविण्याचे दृष्टीने शेती हळ तर तो त्याचा स्वधर्म उरला नाही. तो परधर्म झाला. हा भयानक असतो. कारण परधर्म हा प्रत्येकाला सहजसाध्य नसल्यामुळे त्यात पाहिजे तशी गुणवत्ता न येऊन समाजास हानी पोहोचण्याची शक्यता असते. म्हणून प्रत्येकाने आपला स्वधर्म ओळखून त्याप्रमाणे आपले कर्म म्हणजेच कर्तव्य चोखपणे आणि जबाबदारीने बजावणे आवश्यक आहे. गृहस्थाश्रमी माणसाचा स्वधर्म म्हणजेच स्त्री-पुत्रांचे संगोपन व अन्य संसारी जबाबदार्या पार पाडणे. हे सोडून बेजबाबदारीने जंगलात जाऊन संन्यासी बाबा बनेल अथवा एखादा संन्यासी आत्मचिंतन, अनासक्तीयोग वगैरे स्वधर्म सोडून, इंद्रियलोलूपतेने गृहस्थ-धर्म स्वीकारू पाहील तर ते दोघेही दुःखीकष्टी होतील व स्वधर्माचे गुन्हेगार ठरतील. सारांश, मनुष्याला कर्म करणे अपरिहार्यच आहे तर मग आपणाला व समाजाला हितकर अशा स्वधर्माचेच पालन का करू नये? स्वधर्माचरणानेच इहलोकाची यात्रा नीट चालून पारलौकिक कल्याण साधता येते, असे गीता सांगते. या स्वभावनियत स्वधर्मालाच यज्ञ असे म्हणतात. आज दुर्दैवाने मनुष्य आपला स्वधर्म निष्ठेने पाळताना दिसत नाही. स्वधर्म हा सहजप्राप्त असताना देखील स्वधर्माच्या मार्गात काटे पसरविणार्या परधर्माच्या मोहाची रूपे असंख्य असतात. प्रत्येक कर्मात मोहामुळे मनुष्य आपला फायदाच शोधत असतो आणि त्यामुळे परधर्माकडे तो अधिकाधिक आकृष्ट होतो. परिणामतः कामाच्या गुणवत्तेकडे जाणूनबुजून दुर्लक्ष होऊन समाज अधिकाधिक अधोगतीला जात असतो. असे जर होऊ द्यायचे नसेल तर मनुष्याने परधर्माचा मोह टाळून स्वधर्माचेच काटेकोर आणि प्रामाणिकपणे पालन करणे अवश्य आहे. कर्म करतेवेळी मनुष्याच्या मनाच्या तीन प्रकारच्या अवस्था गीतेने सांगितल्या आहेत. कर्म, विकर्म व अकर्म या त्या तीन अवस्था अथवा प्रकार होत. कर्म हा शब्द गीतेत स्वधर्म या अर्थाने वापरला आहे. खाणे, पिणे, झोपणे वगैरे सर्व कर्मेच आहेत. परंतु ही कर्मे म्हणजे स्वधर्माचरणाची बाहेरची स्थूल क्रिया. या बाह्यकर्मात चित्त किंवा भक्तिभावना ही साधारणतः नसते. मनाचा मेळ त्यात नसतो.

शरीराचा एक यांत्रिक व्यवहार असे त्याचे स्वरूप असते. देवपूजा करताना नोकरांना शिव्या देणाऱ्या ब्राह्मणाच्या देवपूजेला खऱ्या अर्थाने पूजा कर्म म्हणता येणार नाही. कारण त्या पूजेत त्याचे चित्त नसते. देह देवळात आणि चित्त खेटरात ही म्हण सर्वांनाच माहीत आहे. स्थूल बाह्यचरणाच्या या कर्माला ज्यावेळी चित्ताची जोड मिळते अथवा मनाचा मेळ होतो त्यावेळी हे कर्म विकर्म होते. शंकराच्या पिंडीला अभिषेक करताना पाण्याच्या धारेबरोबरच मानसिक एकरूपतेची धार नसेल तर त्या अभिषेकाला काहीही किंमत राहत नाही. एका दगडासमोर दुसरा दगड बसला एवढेच त्याचे स्वरूप असते. एकूण बाह्य क्रिया अथवा कर्म आणि आतील चित्तशुद्धीचे कर्म यांचे मिलन म्हणजेच विकर्म.

एखाद्या हॉटेलमधील स्वयंपाकीही स्वयंपाक करतो आणि घरातील गृहिणीही स्वयंपाक करते. परंतु स्वयंपाकी हा स्वयंपाक करायचा म्हणून करतो. त्यात त्याचे हृदय नाही. तो एक व्यवहार असतो. त्याला गिर्हाईकांच्या भावनांशी काहीही देणे- घेणे नसते. उलट गृहिणी स्वयंपाक करताना आपले हृदय आणि भावना त्यात ओतते. माझा पती, माझा मुलगा हे अन्न खाणार आहे. त्यांना ते स्वादिष्ट लागले पाहिजे, त्यांनी ते पोटभर खाल्ले पाहिजे, हे अन्न खाऊन त्यांच्या प्रकृतीवर काही परिणाम होता कामा नये. या सर्व सात्त्विक भावना ओतून ती आपला स्वयंपाक करते. या भावना ते अन्न खाणाऱ्यांच्या घरातील इतर व्यक्तींच्याही मनात संक्रमित होत असतात. म्हणून स्वयंपाक कसाही झाला तरी तो आपल्याला गोड वाटतो. येथे स्वयंपाकाचे उदाहरण हे निव्वळ कर्माचे उदाहरण तर गृहिणीच्या स्वयंपाकाचे उदाहरण म्हणजे विकर्माचे उदाहरण होय.

कर्माला विकर्माची जोड मिळाली म्हणजे अकर्म निर्माण होते. कर्म अकर्म होऊन जाते. कर्म कर्म राहतच नाही. तो मनाचा आणि शरीराचा सहजधर्म होतो. त्या कर्माचा बोजा वाटत नाही. उलट ते कर्म केल्याशिवाय बरेच वाटत नाही. म्हणजेच करून अकर्ते होतो. करूनही तुम्ही काहीच करत नाही. आपण त्या कर्माचे दास होऊन जातो. मनुष्य पोहावयास शिकतो तेव्हा किती कष्ट होतात. प्रथम पोहताना दमतो. परंतु पुढे इतर श्रम करून थकला तर म्हणतो, चला जरा पोहावयास जाऊ म्हणजे बरे वाटेल. पुढे ते पोहणे मेहनतीचे वाटत नाही. शरीर सहज तरंगते. श्रमणे मनाचा धर्म आहे. मन त्या त्या कर्मात गुंतलेले असले तर श्रम होते. परंतु कर्मे सहज होऊ लागली म्हणजे बोजा वाटत नाही. कर्म आनंदमय होऊन कर्म जणू अकर्म होऊन जाते.

पान ३ वरून

## एकटे राहायचेय...

आपण करीत असलेले काम, त्यामधील कंटाळा आणणारी पुनरावृत्ती, यंत्रवत राबविल्या जात असलेल्या पद्धती, तेच तेच लोक, तेच तेच वातावरण, सर्वच बाबतीतला तोच तोपणा कधी कधी आपल्याला मानसिकदृष्ट्या थकवितो. नेहमीची सवय आल्याने शारीरिक थकवा जाणवत नाही, पण मन थकलेले असते. त्या थकलेल्या मनाला विश्रांती हवी असते. अशी विश्रांती केवळ एकटे राहण्यानेच प्राप्त होऊ शकते. ती अवस्था अशी असते की त्यावेळी कुणीही म्हणजे कुणीही नको असते. कठीण प्रसंगात दाखविली जाणारी सहानुभूती बोचत असते. कारण ती मानसिकताच निराळी असते. त्या स्थितीमध्ये आत्मचिंतन होणार असते, स्वतःचा शोध लागणार असतो किंवा आपणच आपले होणार असतो.

तसे बघितल्यास आईच्या उदरापासून विलग झाल्यानंतर आपण एकटेच असतो. वेगवेगळ्या भावनिक बंधनांनी आपण बांधल्या जरी गेलो तरीही मुळात आपण एकटेच असतो. हे एकटेपण आपल्याला मनःपटलावर कायम जाणत असते आणि म्हणूनच त्या एकटेपणाची आपल्याला कधी कधी आवश्यकता असते. नेमकी हीच मनोवस्था आपल्या भारतीय सामाजिक चौकटीत स्वीकारली जात नाही. ते आत्ममग्न होणे, त्या आत्ममग्नतेतून आत्मबोध होणे व त्या आत्मबोधातून आत्माविष्कार होणे अशी ती प्रक्रिया असते. ही प्रक्रिया पार पाडण्यासाठीच कधीतरी कुणीतरी विनवणी करीत असते ममला एकटे राहू द्या. !फ प्रेम करणार्या व आधार देण्याची इच्छा असलेल्या प्रत्येकाने ही मनोभूमिका समजावून घेतली व त्या व्यक्तीला तिच्याबद्दल गैरसमज न करून घेता एकटे राहू दिले तर अनेक मानसिक समस्या सोडविण्याची ताकद या स्थितीमध्ये निर्माण होते. त्या स्थितीमध्ये त्या मस्वफचा शोध लागला की त्यापासून नेहमीचे जीवन प्रभावीपणे जगण्याची शक्ती प्राप्त होते. त्यासाठीच आपणही कधीकाळी एकटे राहून आत्मचिंतन करावे व इतरांनाही करू द्यावे. ही जीवन सुखकर करण्याची एक प्रकारची साधनाच आहे. त्याचा सन्मान करावा.

पान ४ वरून

## पर्यावरणाचा नव्हे, मानवी अस्तित्वाचाच प्रश्न

वाढते तापमान, अनियमित पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, उष्णतेच्या लाटा, वादळे आणि पूर यांसारख्या नैसर्गिक घटनांची तीव्रता सातत्याने वाढत आहे. या बदलांचा परिणाम केवळ शेती, अर्थव्यवस्था किंवा पर्यावरणावरच होत नाही, तर मानवी आरोग्यावरही त्याचे दूरगामी परिणाम होत आहेत. त्यामुळे हवामान बदलाकडे केवळ पर्यावरणीय संकट म्हणून न पाहता सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीनेही गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे.

जागतिक आरोग्य संघटनेने आरोग्य हा प्रत्येक व्यक्तीचा मूलभूत मानवी हक्क असल्याचे स्पष्ट केले आहे. मात्र, निरोगी आयुष्यासाठी स्वच्छ हवा, शुद्ध पाणी, सुरक्षित अन्न आणि संतुलित पर्यावरण या मूलभूत गरजा आहेत. हवामान बदलामुळे या सर्व घटकांवर विपरीत परिणाम होत असल्याने मानवी आरोग्य धोक्यात येत आहे. (लेखक पर्यावरण अभ्यासक आहेत.)

पान ५ वरून

## वारीः सामुदायिक सदाचाराचे...

लोकप्रबोधनाची, सामुदायिक सदाचाराची, निरपेक्ष परोपकाराची बीजे दडली आहेत. वारीमध्ये जातिभेद, धर्मभेद नाहीत, व्यक्ती म्हणून प्रत्येकाची प्रतिष्ठा समान आहे. क्रोध अभिमान केला पावटणी एक एका लागतील पायी रे संतांचा हा विचार महाराष्ट्राच्या नैतिक जडणघडणीसाठी महत्त्वाचे ठरला. वारीने माणसांना समतेचा संस्कार दिला आणि सामुदायिक समता पालनाला प्रतिष्ठाही दिली. वारीने पायी चालणाऱ्या तळपातळीवरच्या नगण्य माणसांना व त्यांच्या लोकभाषेला प्रतिष्ठा दिली. वारीतील संतांनी लोकभाषेत अभंगांच्या माध्यमातून सामूहिक सदाचाराचे, अहिंसेचे, नैतिकतेचे, स्त्रीला प्रतिष्ठा देण्याचे तत्त्वज्ञान निर्माण केले. संतांनी आपल्या साहित्यातून भाषा, तत्त्वज्ञान आणि कृतिशील नैतिकता यांचे निर्माण आणि संरक्षण संवर्धन केले. संतांकडे लेखक, कवी, विचारवंत या नात्याने पाहिले तर समाजाची नैतिक आणि वैचारिक उन्नती करण्यासाठी, सामूहिक संघटनांतून ऐक्याचा संस्कार देण्यासाठी वारीचे उपयोजन महत्त्वाचे ठरते. संत कुशल असे व्यवस्थापक होते, परंपरेने चालत आलेले वारीचे व्यवस्थापन पाहिले की संतांच्या व्यवस्थापन कौशल्याचा प्रत्यय येतो. वारीचे नियोजन, वारीची शिस्त, वारीतील सेवाभाव, परोपकार, वारीतील परस्पर सहकार्याची जाणीव, व्यक्ती म्हणून प्रत्येकाची समान प्रतिष्ठा यांतून वारीचे संस्कार आणि व्यवस्थापन एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सहजपणे जातात. वारी हे चालतेबोलते लोकविद्यापीठ आहे. सदाचाराएवढी सुंदरता, नैतिकतेएवढे वैभव आणि व्यक्ती म्हणून प्रत्येकाला सन्मान देण्याच्या कृतिशील विचारांची श्रीमंती वारीने दिली आहे. पंढरीची वारी आहे माझ्या घरी, आणिक तीर्थव्रत न करी हे स्वाभिमानाने सांगणारा हा महाराष्ट्र आहे. वारकरी असणे म्हणजेच नीतिमान असणे होय. सांस्कृतिक अधःपतनाच्या आजच्या काळात सामुदायिक नैतिकता आणि सदाचार यांची जपणूक करण्यासाठी वारीचा संस्कार आणि विचार जोपासण्याची गरज आहे.

निमित्त **डॉ. विलास देशपांडे**

# बाळ-गोपाळांच्या विचारातील सार्थकता

**प्रखर बुद्धिप्रामाण्यवादी गोपाळ गणेश आगरकर आणि भारतीय असंतोषाचे जनक बाळ गंगाधर टिळक या दोघांचाही जन्म जुलै १८५६ मध्ये झाला. त्याला यंदा १७० वर्षे झाली आहे. या दोन्ही महनीयांचे विचार आजही तेवढेच सार्थक आहेत. त्याचा हा ऊहापोह...**





गोपाळ गणेश आगरकर आणि बाळ गंगाधर टिळक यांची तत्त्वज्ञानविषयक दृष्टी हा या लेखाचा मुख्य विषय आहे. दोघांचेही कार्य लौकिक व्यवहारास वाहिलेले असल्याकारणाने तत्त्वज्ञानविषयक मताचे उघडरीतीने प्रतिपादन त्यात सापडणे कठीणच आहे. कारण अमुक एक प्रकारची तत्त्वज्ञानविषयक मते लोकांपर्यंत जावी, या एकाच उद्देशाने त्यांनी समाजकार्य केले नव्हते. साधारणतः १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात प्रार्थना समाज आणि ब्रह्म समाज स्थापनेच्या हालचाली मोठ्या प्रमाणावर व्हायला सुरुवात झाली होती. या पृष्ठभूमीवर हिंदुस्थानात नवीन धर्म स्थापन करायचा आग्रह झाल्यास सर्व धर्मांचे सार काढून, त्यातले वाईट तेवढे बाजूला सारून उत्तम तेवढे स्वीकारावे, असा दोघांचाही मानस होता. गुरुवार, १२ मे १८८१ रोजी राव बहादूर नी. ज. कीर्तने यांचे हिरा बागेत हिंदू धर्म व त्याच्या प्रसारावर भाषण झाले. त्यावेळी गोपाळरावांनी धर्मवाद हा दुःखमूलक व संशयपूर्ण आहे, यासाठी तो सोडून देऊन नास्तिकपंथ धरावा असे अप्रासंगिक वक्तव्य केले होते. याच प्रसंगी राव बहादूर रानडे यांनी प्रार्थना समाजासारखाच नवीन धर्म स्थापन करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. या साऱ्या घटनांवर आगरकरांनी केसरीमधून आपले मत मांडले.

परमात्मस्वरूप शोधन, जीवात्मस्वरूप निर्णय, विषयोत्तर स्वरूपज्ञान, जगद्राद्यन्तत्व वगैरे मानवी बुद्धीच्या पोचाच्या बाहेरचे विषय ज्याचे त्यावर सोपवून, सर्वसंमत व सर्वांस आकलन करण्यास सुबोध असे जगा-चे जे बाह्य कल्याण आहे, ते संपादण्याविषयी सर्वांनी धर्मविषयक परस्परविरोध टाकून रात्रंदिवस झटावे, असे त्यात म्हटले होते. आगरकर यांच्या या उतार्‍यावरून त्यांच्या लौकिक चारित्र्याचे गमक उघड होते. जगाचे बाह्य कल्याण होण्यासाठी जनहितवादाला आगरकरांनी प्राधान्य दिले. ब्रह्मसमाज, प्रार्थना समाज यांसारख्या नवीन धर्माच्या वादविवादात त्यांना पडायचे नव्हते. केसरीचे संपादक असताना गोपाळरावांनी आपली मते त्यातून मांडली. पुढे बळवंतराव टिळक केसरीचे संपादक झाल्यानंतर धर्म व व्यवहार यांची खिचडी करण्याची त्यांची पद्धत नसल्या कारणाने त्यांनी आपले धर्मविषयक विचार मांडण्यास सुरुवात केली. प्रो. भांडारकर यांच्याशी धर्मविषयक विरोध असण्यात टिळक व आगरकर यांच्यात एकवाक्यता असली, तरी त्यांनी परस्परांचा जाहीर विरोध केल्याचे आढळत नाही. आगरकर हे अज्ञेयवादी नास्तिक होते व शेवटपर्यंत तसेच राहिले. टिळक हे केसरीचे संपादक झाल्यानंतर बदलल्याचे केसरीतील त्यांच्या धर्मविषयक लेखांवरून दिसते. आगरकर-टिळक यांच्या विचारांची बैठकच निराळी होती.

दोघांचीही पद्धत तार्किक बुद्धीप्रधान होती, ही गोष्ट खरीच. टिळकांचा पिंड शालेय शिक्षणापासूनच तत्त्वज्ञानाच्या वाचनावर तयार झाला होता. वयाच्या १७ व्या वर्षी त्यांचा गीतेशी परिचय झाला. पुढे जसे वाचन वाढत गेले, तसतसे त्यांना गीतेविषयीचे कोडे उलगडत गेले. (गीतारहस्य, प्रस्तावना) एकीकडे स्पेन्सरच्या प्रभावाखाली आगरकरांनी जनसेवेचा मार्ग स्वीकारला, तर दुसरीकडे गीतेमधील लोकसेवेच्या मार्गदर्शक तत्त्वाचा अंगीकार टिळकांनी केला. अज्ञेय मीमांसा या पुस्तकात राव बहादूर ना. ल. फडके यांनी दोघांच्याही जनहितसेवेच्या अनुसरलेल्या भिन्न मार्गावर प्रकाश टाकला आहे. टिळक व आगरकर यांचे या बाबतीत मतभेद असले, तरी ते स्पेन्सरच्या विचारांच्या अर्थाबद्दल नव्हे तर सांप्रत परिस्थितीत ते लागू करावे याबद्दल होते. फडके यांचे विधान टिळकांना फार रुचलेले दिसत नाही. टिळक लिहितात, स्पेन्सर साहेबांचे अज्ञेय सिद्धांताचे आमच्या बंधूस जितके महत्त्व वाटते, तितकेच हिंदुस्थानात जन्मून आम्हास करण्याची जरूरी नाही. विश्वाच्या बुडाशी जे काही आहे, ते सत् आहे. इतकेच नव्हे तर चिदानंदात्मकही आहे. त्यामुळे फडके साहेबांनी आम्हास स्पेन्सर साहेबाच्या आधारावर उपदेश करू पाहणे म्हणजे घरचे सोने विसरून लोकांच्या रुपयाकरिता धाव घेणे होय. ही गोष्ट १८९६ सालातील. मात्र, १८८० च्या सुमारास स्पेन्सरच्या जनहितवादाची कास धरूनच टिळकांनी जनसेवेच्या प्रवाहात उडी टाकली नसेल, अशी एक शंका त्यावेळी उपस्थित करण्यात आली होती. याचा अर्थ टिळकांची मते बदलली असा मात्र घेता येणार नाही. या शंकेचे निरसन १९०२ साली नागपुरात झालेल्या कर्मयोगावरील त्यांच्या व्याख्यानांतून लक्षात येते. लहानपणीच त्यांची गीतेशी ओळख झाली होती. त्यामुळे संस्कृतच्या अभ्यासाने ती विकसित होत गेली, असे त्यांनी म्हटले आहे. (राव बहादूर य. रा. बोडस : वेदान्ताची अष्टाध्यायी) गीतारहस्य (१९१५) हा ग्रंथ जनतेसमोर आला. याच ग्रंथाने टिळकांच्या जनहितसेवा चळवळीला प्रेरणा मिळाली होती. या ग्रंथाने महाराष्ट्रात खळबळ उडवून दिली होती. त्याची वर्णने तत्कालीन मकेसरीफ च्या अंकांतून बघायला मिळतात. या ग्रंथाने कर्मयोगाचे नवे सार सांगून संपूर्ण भारतात नवचैतन्य उत्पन्न केले. तत्त्वविचार नुसते ग्रंथात साठविण्यासाठी नसून प्रत्यक्ष व्यवहारात आचरणात आणण्यासाठी आहे, असे सांगून टिळकांनी विचार आणि आचार यांची सांगड घालून दिली. मगीतारहस्यफ या महान ग्रंथाने हिंदुस्थानाच्या नव्या धर्मविषयक तत्त्वज्ञानाच्या इतिहासात क्रांती घडवून आणली होती. टिळक- आगरकरांचा तात्त्विकवाद केवळ भावविवशतेतून निर्माण झाला नव्हता. बुद्धीला पटल्याशिवाय त्यांनी आपली मते कधीच जाहीर केली नव्हती. अज्ञान नाहीसे होऊन ज्ञानाच्या प्रकाशाने आपला समाज उजळून जावा व यासाठी आपले जीवन देशसेवेला समर्पण करावे, असे दोघांनाही तीव्रतेने वाटत होते. टिळकांनी आगरकरांच्या सुधारणेच्या पुष्ठ्यर्थ दिलेले शास्त्राधार कसे लंगडे आहेत, हे असे पुराव्यानिशी दाखविले. आगरकरांनी केवळ शास्त्राद्धाराचा वापर करून येथील माणसाचे जीवन सुखी होऊ शकणार नाही, हे लोकांना पटवून दिले. दोघांचेही मार्ग वेगळे खरे. बाळ-गोपाळ या दोघांच्याही विचारातील सार्थकता या देशाला आजही लागू होते, हे तेवढेच खरे!

मागोवा **सुजाता बाबर**

# जेव्हा तारा ग्रहाला गिळतो...



**मानवी जिज्ञासेने विज्ञानाला नेहमीच नव्या क्षितिजांकडे नेले. प्रत्येक नवा शोध हा एखाद्या प्रश्नाचे उत्तर देण्याबरोबरच, अनेक नव्या प्रश्नांची दारेही उघडतो. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विश्वातील आजवर अदृश्य राहिलेल्या घटनाही आता उलगडू लागल्या आहेत. त्यामुळे खगोलशास्त्र हे विश्वाची निर्मिती, उत्क्रांती आणि त्यातील पदार्थांच्या अखंड परिवर्तनाचा मागोवा घेणारे विज्ञान ठरले आहे. प्रत्येक नव्या निरीक्षणातून विश्वाकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन अधिक व्यापक, अधिक सखोल आणि अधिक परिपक्व होत आहे. अशाच अंतराळातील एका नव्या घटनेचा मागोवा घेणारा हा लेख...**

रात्रीच्या आकाशात चमकणारे तारे आपल्याला कायमस्वरूपी स्थिर आणि शांत वाटतात. परंतु, प्रत्यक्षात प्रत्येक तारा जन्म घेतो, विकसित होतो आणि अखेरीस मृत्यूच्या दिशेने प्रवास करतो. या प्रवासात त्याच्या सभोवतालच्या ग्रहांचे भवितव्यही बदलते. काही ग्रह अब्जावधी वर्षे त्यांच्या ताऱ्याभोवती सुरक्षितपणे फिरत राहतात; तर काहींचा शेवट अत्यंत भीषण असाच असतो. ते हळूहळू आपल्या ताऱ्याकडे ओढले जातात आणि अखेरीस त्याच्या प्रज्वलित बाह्य आवरणात कायमचे विलीन होतात. अलीकडेच खगोलशास्त्रज्ञांनी प्रथमच अशा एका घटनेचे तपशीलवार निरीक्षण करून ग्रहाचा अंत प्रत्यक्ष पाहिला आहे. त्यामुळे दीर्घकाळ केवळ सैद्धांतिक मानली जाणारी घटना आता प्रत्यक्ष निरीक्षणातून सिद्ध झाली आहे.

ही घटना पृथ्वीपासून सुमारे १२ हजार प्रकाशवर्षे दूर घडली. सुरुवातीला आकाशातील एका ताऱ्याची चमक अचानक वाढल्याचे दिसले. काही दिवसांतच ती पुन्हा कमीही झाली. पहिल्या दृष्टिक्षेपात हा एखादा सामान्य तारकीय स्फोट असावा, असेच वाटले. पण, त्यानंतर विविध दुर्बिणींनी केलेल्या निरीक्षणांमधून चित्र वेगळेच उलगडले. ताऱ्याभोवती मोठ्या प्रमाणात धूळ तयार झाल्याचेही दिसले. परंतु, सामान्य स्फोटांप्रमाणे प्रचंड ऊर्जा किंवा वायू बाहेर फेकल्याचे पुरा-वे मिळाले नव्हते. यामुळे संशोधकांनी या घटनेकडे अधिक बारकाईने पाहण्यास सुरुवात केली. यानंतर जेम्स वेब अंतराळ दुर्बीण या अत्याधुनिक अवकाश दुर्बिणीने या ताऱ्याचे अवरक्त निरीक्षण केले. या निरीक्षणांमधून संशोधकांना धुळीचे जाड आवरण, गरम वायू आणि ग्रहाच्या नाशाशी सुसंगत रासायनिक संकेत आढळले. या सर्व पुराव्यांचा अभ्यास केल्यानंतर समजले की, हा एखादा सामान्य तारकीय स्फोट नव्हता; तर तार्‍याने आपल्या ग्रहाला गिळून टाकल्याचा हा पहिलाच ठोस पुरावा होता.

सुरुवातीला असे वाटत होते की, तारा आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात लाल राक्षसी तारा झाला. त्याचा आकार वाढल्यामुळे त्याने जवळचा ग्रह गिळला. ही कल्पना ताऱ्यांच्या उत्क्रांतीच्या प्रस्थापित सिद्धांताशी जुळणारी होती. परंतु, जेम्स वेबच्या सूक्ष्म निरीक्षणांमुळे वेगळीच कथा समोर आली. ताऱ्याचा आकार अपेक्षेइतका वाढलेला नव्हता. म्हणजे, ग्रह थेट वाढलेल्या ताऱ्यात अडकला नव्हता. ग्रहाची कक्षा हळूहळू लहान होत गेली आणि तो स्वतःच ताऱ्याकडे सर्पिल मार्गाने सरकत गेला. अखेरीस तो ताऱ्याच्या बाह्य आवरणात प्रवेश करून पूर्णपणे नष्ट झाला. ग्रहांचा अंत केवळ ताऱ्याच्या प्रसरणामुळेच होतो, ही धारणा या निरीक्षणाने बदलली. मग प्रश्न असा निर्माण होतो की, ग्रह स्वतःहून तार्‍याकडे का सरकतो?

याचे उत्तर गुरुत्वाकर्षणाच्या अतिशय सूक्ष्म परिणामांमध्ये दडलेले आहे. ग्रह ताऱ्याभोवती फिरताना दोघेही एकमेकांवर गुरुत्वीय परिणाम करतात. पृथ्वीवर चंद्रामुळे जशी भरती-ओहोटी निर्माण होते, तशाच प्रकारचे गुरुत्वीय परिणाम ग्रह आणि ताऱ्यामध्येही घडतात. अब्जावधी वर्षे चालणाऱ्या या परस्परसंवादामुळे ग्रहाच्या कक्षेतील ऊर्जा अत्यंत हळूहळू कमी होत जाते. प्रत्येक प्रदक्षिणेनंतर ग्रह ताऱ्याच्या किंचित अधिक जवळ येतो. हा बदल एका वर्षात किंवा हजार वर्षांत जाणवत नाही; पण लाखो-कोट्यवधी वर्षांनंतर त्याचे परिणाम स्पष्ट दिसू लागतात. जेव्हा ग्रह तार्‍याच्या अत्यंत जवळ पोहोचतो, तेव्हा परिस्थिती झपाट्याने बदलते. ताऱ्याच्या बाह्य वातावरणातील वायू, ग्रहाच्या वातावरणाशी घर्षण निर्माण करतात. घर्षणबलाने ग्रहाची गती आणखी कमी होते. परिणामी, ग्रह अधिकच वेगाने आत ओढला जातो. या प्रक्रियेला कक्षीय क्षय असे म्हणतात. शेवटच्या काही हजार वर्षांत ही प्रक्रिया इतकी वेगवान होते की, ग्रहाचा अंत अटळ होतो.

ग्रह ताऱ्याच्या बाह्य थरात प्रवेश करताच, त्याच्या वातावरणाचे अस्तित्व संपुष्टात येऊ लागते. तापमान हजारो अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्यामुळे प्रथमच वातावरणातील वायू नाहीसे होतात. त्यानंतर खडक वितळू लागतात. महासागर, पर्वत, धातू, खनिजे, ग्रहावरील सर्व काही वितळलेल्या अवस्थेत बदलते. काही वेळानंतर ग्रहाचे स्वतंत्र अस्तित्वच उरत नाही. तो पूर्णपणे ताऱ्याच्या बाह्य आवरणात मिसळून जातो.

ग्रह नाहीसा झाला म्हणजे घटना संपली, असे नाही. ग्रहातील खडक, लोखंड, मॅग्नेशियम, सिलिकॉन आणि इतर जड मूलद्रव्ये ताऱ्याच्या बाह्य थरात मिसळतात. यामुळे ताऱ्याच्या वातावरणाच्या रासायनिक रचनेत तात्पुरते बदल घडू शकतात. काही प्रसंगी ताऱ्याची चमकही वाढू शकते. ग्रहाच्या नाशातून बाहेर पडणारी धूळ ताऱ्याभोवती पसरते आणि अवरक्त तरंगलांबीमध्ये ती स्पष्ट दिसू लागते. याच धुळीच्या निरीक्षणामुळे संशोधकांना ही घटना ओळखता आली. याचसंदर्भात आपल्या स्वतःच्या सौरमालेचा विचार केल्यास एक महत्त्वाचा प्रश्न समोर येतो की, पृथ्वीचे भवितव्य काय?

सध्या सूर्य त्याच्या आयुष्याच्या मध्यावस्थेत आहे. त्याचे वय सुमारे ४.६ अब्ज वर्षे असून, तो आणखी सुमारे पाच अब्ज वर्षे स्थिर राहील. याकाळात त्याच्या केंद्रभागात हायड्रोजनचे हेलियममध्ये रूपांतर होत राहील. परंतु, जेव्हा केंद्रातील हायड्रोजन जवळजवळ संपून जाईल, तेव्हा सूर्याच्या अंतर्गत रचनेत मोठे बदल सुरू होतील. त्याचे बाह्य आवरण प्रचंड फुगू लागेल आणि तो लाल राक्षसी तारा बनेल. त्याच वेळी त्याचा व्यास आजच्या तुलनेत शेकडो पटींनी वाढेल.

बुध आणि शुक्र या ग्रहांचे अस्तित्वच जवळजवळ निश्चितपणे संपुष्टात येईल. पृथ्वीचे भवितव्य मात्र अजूनही संशोधनाचा विषय आहे. काही गणिती प्रतिमानांनुसार, सूर्याचे बाह्य आवरण पृथ्वीच्या कक्षेपर्यंत पोहोचू शकते. तर, काही संशोधनानुसार सूर्य वस्तुमान गमावत असल्यामुळे पृथ्वीची कक्षा थोडी बाहेर सरकेल. परंतु, पृथ्वी प्रत्यक्ष गिळली गेली नाही, तरी तिच्यावर जीवन टिकण्याची कोणतीही शक्यता उरणार नाही. महासागर आधीच आटून गेलेले असतील, वातावरण नाहीसे झाले असेल आणि पृष्ठभाग वितळलेल्या खडकांच्या महासागरात बदललेला असेल. ग्रह ताऱ्यात विलीन होण्याच्या घटना विश्वात किती सामान्य आहेत, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. आजपर्यंत हजारो बाह्यग्रहांचा शोध लागला आहे. त्यांपैकी अनेक ग्रह आपल्या ताऱ्याच्या अत्यंत जवळ फिरतात. काहींची प्रदक्षिणा अवघ्या एक-दोन दिवसांत पूर्ण होते. संशोधकांच्या मते, आपल्या आकाशगंगेत दरवर्षी अनेक ग्रह आपल्या तार्‍यांमध्ये विलीन होत असावेत. मात्र, या घटना अत्यंत दूर घडत असल्यामुळे त्यांचे निरीक्षण करणे कठीण असते. म्हणूनच, नुकतीच नोंदवलेली घटना मोलाची ठरली. या निरीक्षणामुळे ग्रहविज्ञानाला एक नवीनच दिशा निर्माण झाली आहे. आजवर ग्रहांचा अभ्यास मुख्यतः त्यांच्या आकार, वस्तुमान, वातावरण आणि जीवनयोग्यतेच्या दृष्टीने केला जात होता. आता ग्रहांचा शेवट कसा होतो, त्यांच्या नाशामुळे ताऱ्यांमध्ये कोणते रासायनिक बदल घडतात, ग्रहातील जड मूलद्रव्ये ताऱ्याच्या वातावरणात कशी मिसळतात आणि त्याचा पुढील उत्क्रांतीवर काय परिणाम होतो, याचाही अभ्यास सुरू झाला आहे. म्हणजेच, ग्रहाचा मृत्यू ही केवळ एका जगाची समाप्ती नसून, तो ताऱ्याच्या उत्क्रांतीतील एक महत्त्वाचा टप्पा असू शकतो.

या संशोधनातून आणखी एक रोचक कल्पना पुढे आली. एखाद्या ताऱ्याच्या वातावरणात लिथियमसारखी काही मूलद्रव्ये अपेक्षेपेक्षा जास्त प्रमाणात आढळली, तर त्याने भूतकाळात एखादा ग्रह गिळला असण्याची शक्यता तपासली जाते. म्हणजेच, ग्रह स्वतः अस्तित्वात नसला; तरी त्याचे रासायनिक अवशेष ताऱ्याच्या वातावरणात जतन होऊ शकतात. भविष्यात अशा रासायनिक खुणांच्या आधारे विश्वातील किती ताऱ्यांनी ग्रह गिळले असतील, याचा अंदाज बांधणे शक्य होईल. या घटनेचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे, ग्रह आणि तारा यांच्यातील नाते. आपण अनेकदा ग्रहांना ताऱ्याचे शांत सहचर समजतो. प्रत्यक्षात हे नाते सतत बदलणारे असते. ग्रह ताऱ्याच्या गुरुत्वामुळे घडतो, त्याच्याकडून ऊर्जा मिळवतो, त्याभोवती अब्जावधी वर्षे फिरतो आणि अखेरीस काहीवेळा त्याच ताऱ्यात विलीन होतो. म्हणजे, ग्रहाचा जन्म आणि मृत्यू दोन्ही एका अर्थाने ताऱ्याशीच जोडलेले असतात. विश्वातील पदार्थ सतत एका रूपातून दुसऱ्या रूपात बदलत राहतो, याचे हे आणखी एक सुंदर उदाहरण.जेम्स वेब अवकाश दुर्बिणीमुळे अशा घटनांचा अभ्यास आता अधिक वेगाने होणार आहे. अवरक्त तरंगलांबीमध्ये धूळ, गरम वायू आणि रासायनिक संयुगे स्पष्टपणे दिसत असल्यामुळे ग्रह गिळण्याच्या घटनांची ओळख अधिक अचूकपणे करता येईल. पुढील काही वर्षांत अशा अनेक घटना सापडण्याची शक्यता आहे. त्यामुळे ग्रहांचा जन्म, त्यांचे आयुष्य आणि त्यांचा शेवट या संपूर्ण जीवनचक्राचे अधिक वास्तव चित्र आपल्यासमोर येईल.

विश्वात कोणतीही गोष्ट कायमची नसते. पर्वत, महासागर, ग्रह, तारे आणि आकाशगंगादेखील काळाच्या ओघात बदलत राहतात. आज स्थिर आणि सुरक्षित वाटणारा ग्रहही अब्जावधी वर्षांनंतर आपल्या ताऱ्याच्या प्रज्वलित उदरात विलीन होऊ शकतो. ही कल्पना भयावह वाटली, तरी ती विश्वाच्या अखंड परिवर्तनाची साक्ष आहे. ग्रहाचा शेवट म्हणजे केवळ एका जगाचा अंत नसतो; तो विश्वातील पदार्थ आणि ऊर्जेच्या अखंड चक्रातील आणखी एक टप्पा असतो. ताऱ्याने ग्रहाला गिळल्याचा हा पहिला प्रत्यक्ष पुरावा केवळ एका दुर्मीळ खगोलीय घटनेची नोंद नाही, तर विश्वातील ग्रहांच्या जीवनकथेचे शेवटचे पान प्रथमच आपल्या डोळ्यांसमोर उलगडल्याचा ऐतिहासिक क्षण आहे.

# भारत- यूके मुक्त व्यापार कराराचा श्रीगणेशा!

**भारत- यूके दरम्यान ऐतिहासिक अशा मुक्त व्यापार कराराच्या अंमलबजावणीचा प्रारंभ १५ जुलैपासून झाला. याअंतर्गत ९९ टक्के वस्तूंवर शून्य आयातशुल्क आकारले जाईल. त्यानिमित्ताने या कराराचा घेतलेला हा आढावा...**

विदेशनिती तेजस परब



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात आणि केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पीयूष गोयल यांच्या प्रयत्नाने अखेर ऐतिहासिक असा भारत- यूके व्यापक आर्थिक व व्यापार करार (सेटा) आणि सामाजिक सुरक्षा करार अधिकृतपणे बुधवार, दि. १५ जुलैपासून लागू झाला; ज्यामुळे भारताचे उत्पादन स्पर्धात्मकदृष्ट्या त्या देशात बाजारात उतरेल आणि निर्यातीत वाढ होईल, अशी अपेक्षा आहे.

### केंद्र सरकारची भूमिका काय?

केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्या मते, या दोन्ही करारांमुळे भारत- ब्रिटन संबंध आणखी मजबूत होतील. शेतकरी, उद्योजक, एमएसएई क्षेत्राला गती मिळण्याची अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, भारतीय उत्पादनांना मुक्तपणे ब्रिटनच्या बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळू शकेल. भारतीय कुशल व्यावसायिक, उद्योजकांना जागतिक व्यासपीठ मिळण्यास मदत होईल. सामाजिक सुरक्षा या महत्त्वाच्या करारामुळे तिथे तात्पुरत्या स्वरूपात काम करणार्या भारतीय व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. भारतीय कंपन्यांची मुक्त व्यापारामुळे स्पर्धाही तुलनात्मक होईल, असा सरकारला विश्वास आहे.

### भारतीय उत्पादनांची मागणी वाढणार:-

या कराराद्वारे केवळ मद्यपेयांच्या किमती स्वस्त झाल्याचे मथळे वाचून अनेकांच्या भुवया उंचावल्या असतीलही. मात्र, त्यापेक्षाही जास्त भारतासारख्या देशात जिथे आजही वस्त्रोद्योग, चर्मोद्योग, खाद्यपदार्थ, भाज्या, मसाले आणि सागरी उत्पादनांवरील लावला जाणारा यापूर्वीचा ४ ते १६ टक्क्यांचा कर आता संपुष्टात येणार आहे. त्यामुळे भारतीय बाजारपेठेतील उत्पादनांची ब्रिटनमध्ये मागणी वाढण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे.

### कार, ट्रकवरील आयातशुल्क घटणार:-

या कराराअंतर्गत भारतात ब्रिटनहून येणाऱ्या कार, ट्रक आणि अन्य वाहनांवरील आयातशुल्क घटविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही प्रक्रिया टप्प्याटप्प्यांत पूर्ण होणार असली, तरीही ई- वाहने, हायब्रीड वाहने, हायड्रोजन कार आदी उत्पादनांना पाच वर्षांचे सुरक्षा कवच देण्यात येणार आहे. याउलट, ब्रिटनने भारतीय वाहन उत्पादनांसाठी आपले दरवाजे खुले केले आहेत, ज्याचा फायदा इथल्या कंपन्यांना अपेक्षित आहे.

### विदेशी मद्यपेय होणार स्वस्त:-

यापूर्वी, विदेशी मद्यपेयांवर एकूण दीडशे टक्क्यांपर्यंत भरभक्कम शुल्क भरावे लागत असे. पुढील दहा वर्षांत ते घटवून ४० टक्क्यांवर आणण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

### करारादरम्यानही संवेदनशीलता महत्त्वाची:-

भारताने हा करार करताना आपल्या संवेदनशील क्षेत्राचाही विचार केला आहे. ज्यात दूध उत्पादन, डेअरी उत्पादन, अन्न, भरडधान्य, सफरचंद, अक्रोड आदी वस्तूंवरील करात कुठलाही बदल होणार नाही, असे ठरले. याचप्रमाणे ब्रिटनने त्यांच्या तांदूळ, साखर आणि मांस उत्पादनांना सुरक्षित ठेवले आहे. त्यामुळे दोन्ही देशांनी स्थानिक उत्पादनांबद्दल कुठल्याही प्रकारची तडजोड केलेली नाही.

### पायाभूत सुविधांमध्ये बदल दिसणार?

केंद्र सरकारने पहिल्यांदाच ब्रिटनच्या कंपन्यांना भारतीय निविदांमध्ये नशीब आजमावण्याची संधी दिली आहे. रस्ते व दळणवळण, हरितऊर्जा आदी क्षेत्रांची द्वारे ब्रिटनसाठी खुली करण्यात आली आहेत. याचाच अर्थ, एकूण ४० हजार कोटींपर्यंतच्या पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांसाठी ब्रिटिश कंपन्या बोली लावू शकतील. यासोबतच भारताने बौद्धिक संपदा अधिकार अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणजे, देशातील कुठल्याही आणीबाणीच्या स्थितीत भारताकडे स्वस्त औषधे उत्पादन करण्याचे अधिकार अबाधित राहण्याची अटही मंजूर करून घेण्यात आली.

### भारतीय वंशाच्या नोकरदार वर्गाला दिलासा:-

टीसीएस, इन्फोसिस यांसारख्या कंपन्यांचे भारतीय वंशाचे कर्मचारी जेव्हा ब्रिटनमध्ये कार्यरत असतात, तेव्हा त्यांना भारतात ईपीएफ आणि ब्रिटनमध्ये राष्ट्रीय विमा (सामाजिक सुरक्षा) शुल्क भरावे लागत असे. यालाच दुप्पट योगदान म्हणून गणले गेले. त्यामुळे आता भारतीय कर्मचारी जर पाच वर्षांसाठी तात्पुरत्या स्वरूपात नोकरीवर असेल, तर त्याला हे दुबार शुल्क भरण्याची गरज राहणार नाही, असाही ठराव या करारात आहे. याचा फायदा भारतीय कंपन्यांना होणार असून, त्यांना विदेशी कंपन्यांच्या तुलनेत एकाच पातळीवर स्पर्धात्मक वातावरण राहील.

### ११ लाख टनांची स्टील-निर्यात करमुक्त:-

भारत-ब्रिटन कराराअंतर्गत एकूण ११ लाख टनांची स्टील-निर्यात करमुक्त होणार आहे. ही सुविधा भारताला विशिष्ट कोटा आणि ऑथराईल्ड युझ स्कीम (एयूएस) अंतर्गत विशेष लाभ झाला. ब्रिटनने स्टील उत्पादन व विक्रीवर विशेषाधिकार लागू केले होते, ज्या कारणास्तव हा करार लागू करण्यात अडथळे आले होते. गतवर्षात एकूण ९ हजार, २२७ कोटी रुपयांची पोलाद- निर्यात भारताद्वारे ब्रिटनला करण्यात आली होती. भारताच्या निर्यात हक्कांना अबाधित ठेवण्यासाठी विशिष्ट कोटा १.६८ लाख टन इतका करण्यात आला. त्यानंतर एयूएस अंतर्गत भारताला ९.४५ लाख टन हा विशेष कोटाही प्रदान करण्यात आला.

असोचॅमचे अध्यक्ष निर्मल के. मिंडा यांच्या मते, भारत- यूके व्यापक आर्थिक आणि व्यापार करार (सीईटीए) हा भारताच्या मुक्त व्यापार करार (एफटीए) प्रवासातील एक ऐतिहासिक टप्पा आहे, जो व्यापक मुक्त व्यापार भागीदारीच्या माध्यमातून जगातील दोन सर्वांत जुन्या लोकशाही देशांना एकत्र आणतो. या करारांतर्गत, ब्रिटनला होणाऱ्या भारताच्या ९९ टक्के निर्यातीला शुल्क- मुक्त प्रवेश मिळणार आहे, तर भारतानेही आपल्या ८९.५ टक्के टेरिफ लाईन्स (उत्पादन श्रेणी) ब्रिटनसाठी खुल्या केल्या आहेत. या कराराचा भारताच्या वस्त्रोद्योग, चामडे, सागरी उत्पादने, हिरे व आभूषणे, इंजिनिअरिंग वस्तू आणि रसायने यांसारख्या प्रमुख क्षेत्रांना मोठा फायदा होण्याची अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे, ब्रिटनलादेखील ऑटोमोटिव्ह, पेय पदार्थ व स्पिरिट्स, लाईफ सायन्सेस आणि आरोग्यसेवा यांसारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये लक्षणीय लाभ मिळण्याची शक्यता आहे, असेही त्यांचे मत आहे.



# चिनी एकाधिकारशाहीला १४ देशांची चपराक

वेध संजीव ओक

**दक्षिण चीन समुद्र म्हणजे आपली खासगी मालमत्ता, या बीजिंगच्या भ्रमाला आता तडे जाऊ लागले आहेत. चीनच्या अवास्तव सागरी दाव्यांविरोधात १४ देश एकत्र उभे राहिले. ड्रॅगन शक्तिशाली असला; तरी त्याची दहशत आता कमी झालेली आहे, हाच बदलत्या इंडो- पॅसिफिकचा स्पष्ट संदेश...**

आंतरराष्ट्रीय राजकारणात नुकतीच एक अत्यंत महत्त्वपूर्ण, अभूतपूर्व आणि ऐतिहासिक घडामोड घडली. दक्षिण चीन समुद्रावर केवळ आणि केवळ आपलाच एकाधिकार आहे, असा अवास्तव आणि बेकायदेशीर दावा करणार्या चिनी ड्रॅगनला १४ देशांनी मिळून सणसणीत आणि सामूहिक चपराक लगावली. हे १४ देश एकत्र येऊन चीनच्या विस्तारवादी धोरणाविरुद्ध अत्यंत खंबीरपणे उभे राहिले. आजवर चीनची पद्धत अत्यंत कुटिल होती; शेजारील लहान देशांना एकटे गाठायचे, त्यांना लष्करी आणि आर्थिक ताकदीची भीती दाखवायची आणि त्यांच्या हद्दीत घुसखोरी करायची. पण, आता परिस्थिती बदलली आहे. या सर्व देशांनी संघटित होऊन चीनच्या दाव्यांना संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठावर आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पष्ट शब्दांत नकार दिला आहे. ही घटना आशियाई आणि जागतिक राजकारणातील एका मोठ्या बदलाचा स्पष्ट संकेत ठरली आहे.

चीनला गेली अनेक दशके असा भ्रम होता की, त्यांच्या वाढत्या आर्थिक आणि लष्करी ताकदीला घाबरून त्यांच्याविरोधात कोणीही ब्रम काढणार नाही. हा संपूर्ण प्रदेश आपलाच आहे, इथे आपलेच नियम चालतील आणि आपण वाटेल तशी दादागिरी करू शकतो, ही चीनची विस्तारवादी प्रवृत्ती होती. जणूकाही आपल्याविरोधात कृती करण्याचे धाडस जगात कोणातही नाही, अशा आविर्भावात चिनी कम्युनिस्ट पाट वावरत होती. पण, १४ देशांच्या या एकत्रित आणि आक्रमक विरोधामुळे चीनच्या या भ्रमाचा भोपळा अखेर फुटला आहे. आंतरराष्ट्रीय सागरी कायद्यांना धाब्यावर बसवून, समुद्रात कृत्रिम बेटे तयार करून शेजाऱ्यांच्या हद्दीत घुसखोरी करणाऱ्या चीनला आता सणसणीत चपराक बसली आहे आणि दादागिरीचे दिवस संपले आहेत, हा स्पष्ट संदेश चीनपर्यंत पोहोचला आहे. दक्षिण चीन समुद्र हा जागतिक व्यापाराचा अत्यंत महत्त्वाचा जलमार्ग. दरवर्षी अब्जावधी डॉलर्सचा व्यापार याच मार्गाने होतो. तसेच या क्षेत्रात नैसर्गिक तेल आणि वायूचे मोठे साठे दडलेले आहेत. या संपत्तीवर डोळा ठेवून चीनने नाईन-डॅश लाईन नावाचा एक काल्पनिक नकाशा तयार करून, या संपूर्ण समुद्रावरच आपला हक्क सांगितला होता. यामुळे फिलीपिन्स, व्हिएतनाम, मलेशिया, तैवान आणि ब्रुनेई यांसारख्या देशांच्या सार्वभौमत्वाला थेट धोका निर्माण झाला होता.

दक्षिण चीन समुद्रावर चीनने गेली अनेक दशके मनमानी केली. ङ्कनाईन-डॅश लाईनफ नावाची रेषा नकाशावर ओढायची आणि त्या रेषेच्या आतील समुद्र, बेटे, प्रवाळभित्ती आणि साधनसंपत्तीवर ऐतिहासिक अधिकार सांगायचा, ही चिनी विस्तारवादाची पद्धत. आंतरराष्ट्रीय सागरी कायदा काय सांगतो, शेजारी देशांचे विशेष आर्थिक क्षेत्र कुठे आहे किंवा त्यांच्या सार्वभौम अधिकारांचे काय, याची कोणतीही फिकीर चीनने कधीही केली नाही. कारण, चीनच्या राजकारणाचा मूलमंत्रच वेगळा आहे- आधी दावा करा, नंतर तेथील उपस्थिती वाढवा. त्यासाठी लष्करी किंवा निमलष्करी दबाव निर्माण करा आणि काही वर्षांनी त्या घुसखोरीलाच ऐतिहासिक वास्तव म्हणून जगासमोर मांडा, ही ती पद्धती. हिमालयापासून दक्षिण चीन समुद्रापर्यंत ही विस्तारवादी भूमिका कायम असल्याचे दिसून येते. कृत्रिम बेटे उभारणे, त्यांचे लष्करीकरण करणे, तटरक्षक दलाच्या जहाजांद्वारे छोट्या देशांना धाक दाखवणे, प्रतिस्पर्धी जहाजांना माघार घ्यायला भाग पाडणे आणि नंतर उलट त्यांच्यावरच चिथावणीखोरीचा आरोप करणे, हे सारे चीनच्या ग्रे झोन वॉरफेअरफचे परिचित तंत्र आहे.

चीनच्या या दादागिरीला आजवर कोणीही ठामपणे विरोध करण्याचे धाडस दाखवत नव्हते. प्रत्येक जण चीनशी द्विपक्षीय संघर्ष टाळण्याचा प्रयत्न करत होता. मात्र, या देशांना अचानक चीनच्या डोळ्याला डोळा भिडवण्याची आणि संघटित होण्याची हिंमत कुठून मिळाली, या प्रश्नाचे उत्तर भारताच्या बदललेल्या परराष्ट्र धोरणात आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वात दडलेले आहे. या १४ देशांच्या एकजुटीमागे भारताची ङ्कक्ट ईस्ट नीती आणि पंतप्रधान मोदींचे अलीकडचे दौरे कारणीभूत ठरले आहेत, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

मोदींच्या नेतृत्वाखालील भारताने चीनच्या विस्तारवादाला कधीही भीक घातली नाही. मग तो डोकलामचा वा गलवान खोऱ्यातील रक्तरंजित संघर्ष असेल; भारताने चीनला त्यांच्याच भाषेत चोख आणि जशास तसे प्रत्युत्तर दिले. चीनला रोखले जाऊ शकते आणि चीन अजिंक्य नाही, हा धोरणात्मक आत्मविश्वास भारतानेच या आग्नेय आशियाई देशांच्या मनात निर्माण केला. याहून महत्त्वाचे म्हणजे, पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील भारताने या देशांना केवळ शाब्दिक किंवा नैतिक पाठिंबा देऊन समाधान मानले नाही, तर त्यांना प्रत्यक्ष सामरिक ताकदही पुरवली आहे. भारताने फिलीपिन्सला ब्रह्मोस या जगातील सर्वांत घातक सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्रांचा पुरवठा केला. फिलीपिन्सने ही क्षेपणास्त्रे थेट दक्षिण चीन समुद्राच्या दिशेने तैनात केली आहेत. हा चीनसाठी सर्वांत मोठा सामरिक आणि मानसिक धक्का होता. व्हिएतनाम, इंडोनेशिया आणि मलेशियासोबत भारताने आपले संरक्षण आणि नौदल संबंध अभूतपूर्व स्तरावर नेऊन ठेवले आहेत. पंतप्रधान मोदींच्या आग्नेय आशियाई देशांच्या आणि इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील दौऱ्यांमुळे या लहान देशांना मोठा विश्वास मिळाला की, चीनच्या दादागिरीविरुद्ध लढण्यासाठी भारत एक विश्वमित्र आणि नेट सिक्युरिटी प्रोव्हायडर म्हणून खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभा आहे. क्वाड च्या माध्यमातूनही भारताने इंडो-पॅसिफिक क्षेत्रात मुक्त, खुल्या आणि नियमांवर आधारित सागरी वाहतुकीचा पुरस्कार करत, चीनची चहूबाजूंनी कोंडी केली आहे.

एक काळ असा होता की, आशियामध्ये चीन विरुद्ध अमेरिका असाच सामना रंगायचा आणि लहान देश चीनच्या दहशतीखाली जगायचे. अमेरिकेवर पूर्णपणे विसंबून राहता येत नाही, हे या देशांना माहीत होते. अशा वेळी भारताने एक भक्कम आशियाई महाशक्ती म्हणून जी पोकळी भरून काढली आहे, ती अतुलनीय अशीच. १४ देशांनी चीनला दिलेला हा सामूहिक नकार म्हणजे, चीनच्या हुकूमशाही आणि विस्तारवादी प्रवृत्तीला कडक इशारा ठरला आहे. चीनने आता हे लक्षात ठेवले पाहिजे की, २१वे शतक हे बहुध्रुवीय आहे आणि इथे कोणा एका देशाची एकाधिकारशाही किंवा अरेरावी खपवून घेतली जाणार नाही. पंतप्रधान मोदींच्या आक्रमक, धोरणी आणि मुत्सद्देगिरीने चीनच्या विस्तारवादी मनसुब्यांना जे मोठे भगदाड पाडले आहे, ते भविष्यात चीनच्या सामरिक पीछेहाटीचे सर्वांत मोठे कारण ठरेल, यात तिळमात्र शंका नाही.



## वारी

भक्त तुझा म्हणे । येजो बा वारीत ।
राहा आनंदात । क्षणभर ।।
निघालो निश्चिंत । नि:स्पृह होऊन ।
स्वानंद लाभून । स्थिरावलो ।।
आषाढाची वारी । भक्तीचा सागर ।
भक्तांचे माहेर । पंढरीत ।।
जात पात धर्म । नाहीच वारीत ।
भावना जपत । बंधुभाव ।।
लगबग किती । विठ्ठल भेटीची ।
उसंत मनीची । निवळेना ।।
तहान भूकही । अर्पिली श्रीहरी ।
भागविते परी । विठूराया ।।
भगवंत माझा । सखा पांडुरंग ।
भक्ताचिया संग । नाचे खेळे ।।
पंढरपुरात । विठूचा कल्लोळ ।
भक्तांचा हा मेळ । दौडतसे ।।
वाट लेकरांची । पाहतो श्रीहरी ।
उभा विटेवरी । रुक्मिसंगे ।।

अरुणा देशपांडे

## माय विठुली

माहेर पंढरी ।
विठ्ठल माउली ।।
बहीण थोरली ।
चंद्रभागा ।।१।।
सय माहेराची ।
वारी आषाढीची ।।
माउली भेटीची ।
लागी ओढ ।।२।।
निघे वारकरी ।
बोलवी माउली ।।
मायाळ विठुली ।
साद घाली ।।३।।
ती लेकुरवाळी ।
अंगा खांद्यावरी ।।
भक्तांना खेळवी ।
विठू माय ।।४।।
मायेने पोषण ।
नजर प्रेमळ ।।
भक्त अवखळ ।
असे जरी ।।५।।
जगा पाठीवरी ।
असे भक्त जरी ।।
सदा कृपा करी ।
भक्तांवरी ।।६।।
विठू माझी माय ।
विठू माझा बाप ।।
सर्वांचा त्रिताप ।
तोच हारी ।।७।।

हेमांगी देशपांडे